# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा कार्यक्रम

*(हा कार्यक्रम ३१ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर १९६४ रोजी कोलकाता येथील पक्षाच्या ७व्या काँग्रेसने मंजूर केला आणि २०-२३ ऑक्टोबर २००० रोजी तिरुवनंतपुरम येथील विशेष पक्ष अधिवेशनाने तो अद्ययावत केला.)*

## १
## प्रस्तावना

**१.१** कम्युनिस्ट पक्ष भारतीय जनतेच्या पुरोगामी, साम्राज्यशाहीविरोधी आणि क्रांतिकारक परंपरांचा वारसदार आहे. रशियामधील ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीपासून स्फूर्ती घेतलेल्या एका छोट्या दृढनिश्चयी साम्राज्यवादविरोधी गटाने, १९२० साली पक्ष स्थापन केल्यापासून, आपल्यासमोर संपूर्ण स्वातंत्र्य आणि मूलभूत सामाजिक परिवर्तन यांसाठी लढण्याचे उद्दिष्ट ठेवले. वर्गीय शोषणापासून आणि सामाजिक जुलुमांपासून मुक्त असा समाजसत्तावादी समाज भारतात स्थापन करण्यास पक्षाने स्वत:ला वाहून घेतले.

**१.२** सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवादाशी इमान राखून, पक्षाने विसाव्या शतकाची प्रमुख वैशिष्ट्ये असलेल्या, साम्राज्यवादी व्यवस्थेविरुद्ध चाललेल्या राष्ट्रीय मुक्ती संग्रामांना आणि जगभर लोकशाही व समाजसत्तावाद यांसाठी चाललेल्या लढ्यांना सातत्याने पाठिंबा दिला. राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी, समाजसत्तावादाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि साम्यवादाच्या अखेरच्या ध्येयाकडे आगेकूच करण्यासाठी, पक्षाने आपल्या कृतीला मार्गदर्शक म्हणून मार्क्सवाद-लेनिनवादाच्या तत्त्वांचा स्वीकार केला. संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी देशात सर्वप्रथम उठविणारे कम्युनिस्टच होते आणि त्यासाठी त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अहमदाबाद येथे १९२१ साली भरलेल्या अधिवेशनात एक ठराव मांडला होता.

**१.३** संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करीत असतानाच, कम्युनिस्टांनी जमीनदारशाहीचे उच्चाटन, सरंजामदारी वर्चस्वाचा अंत आणि जातपातवादी

जुलुमाचे निर्मूलन, यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांचा समावेश असलेला, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचा एक निश्चित कार्यक्रम घेऊन स्वराज्याच्या घोषणेला आमूलाग्र आशय देण्याच्या निकडीवर भर दिला.

**१.४** स्वातंत्र्यलढ्यामध्ये भाग घेत असताना कम्युनिस्टांनी सुरुवातीपासूनच ट्रेड युनियन्समध्ये कामगारांना, किसान सभेमध्ये शेतकऱ्यांना, विद्यार्थी युनियन्समध्ये विद्यार्थ्यांना व इतर संबंधित जनसंघटनांमध्ये त्या-त्या जनविभागांना संघटित करण्यासाठी आपली ताकद वेचली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अखिल भारतीय किसान सभा आणि अखिल भारतीय विद्यार्थी फेडरेशन यांसारख्या राष्ट्रीय संघटनांची स्थापना झाली आणि अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस बलशाली झाली. कम्युनिस्टांनी पुरोगामी लेखक संघ आणि भारतीय जननाट्य संघटना (इप्टा) यांसारख्या पुरोगामी साहित्यिक व सांस्कृतिक संघटना स्थापन करण्यामध्ये पुढाकार घेतला.

**१.५** ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतातून कम्युनिझम उखडून काढण्याचा निर्धार केला होता. बाल्यावस्थेत असलेल्या कम्युनिस्ट गटांवर त्यांनी पाशवी दडपशाही चालविली आणि क्रांतिकारी विचारांचा प्रसार रोखण्यासाठी कम्युनिस्ट वाङ्मयावर बंदी घातली. कम्युनिस्ट आंदोलनाच्या जवान नेतृत्वावर त्यांनी एकामागून एक कटकारस्थानाचे खटले लादले - पेशावर (१९२२), कानपूर (१९२४) आणि मीरत (१९२९). विशीच्या दशकात पक्ष स्थापन झाल्यावर लगेचच तो बेकायदेशीर घोषित केला गेला आणि दोन दशकांहून जास्त काळ त्याला बेकायदेशीर अवस्थेत कार्य करावे लागले. अशी प्रचंड दडपशाही झाली असताही, पक्षाने संपूर्ण स्वातंत्र्यासाठी आणि आमूलाग्र समाजपरिवर्तनासाठी जनतेला संघटित करण्याच्या कार्यामध्ये अविचल प्रगती केली.

**१.६** कम्युनिस्ट पक्षाच्या लढाऊ आणि सातत्यपूर्ण साम्राज्यवादविरोधी भूमिकेमुळे आकर्षित होऊन अनेक क्रांतिकारी प्रवाह व लढवय्ये पक्षात सामील झाले. त्यांमध्ये पंजाबचे गदर वीर, भगतसिंगांचे सहकारी, बंगालचे क्रांतिकारक, मुंबई आणि मद्रास इलाख्यांतील झुंजार कामगारवर्गीय लढवय्ये यांचा, तसेच केरळ, आंध्र प्रदेश आणि देशाच्या इतर भागांतील लढाऊ साम्राज्यवादविरोधी काँग्रेसजनांचाही समावेश होता. अशाप्रकारे साऱ्या देशभराच्या उत्कृष्ट लढवय्यांच्या प्रवेशाने पक्ष समृद्ध झाला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या



नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्याशी आणि नंतर काँग्रेस सोशलिस्ट पक्षाशी जवळिकीचे सहकार्य करीत असताना, कम्युनिस्ट पक्षाने सर्वहारावर्गाचा एक स्वतंत्र पक्ष म्हणून स्वत:ची उभारणी करून तो बलशाली करण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

**१.७** दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात भारतीय जनतेचे शक्तिशाली साम्राज्यशाहीविरोधी व सरंजामशाहीविरोधी उठाव झाले. देशाच्या विविध भागांत ह्या उठावांचे नेतृत्व करण्यामध्ये कम्युनिस्ट पक्ष आघाडीवर होता. असे वैशिष्ट्यपूर्ण लढे म्हणजे तिभागा, पुन्नप्रा-वायलार, उत्तर मलबार, वारली आदिवासी, त्रिपुरा आदिवासी जनता, आणि सर्वांत महत्त्वाचा व ऐतिहासिक असा तेलंगणच्या शेतकऱ्यांचा सशस्त्र लढा हे होते. कम्युनिस्ट पक्षाने अनेक संस्थानिकांच्या राज्यांत जबाबदार सरकार असण्यासाठी चाललेल्या जनतेच्या आंदोलनांमध्येदेखील नेतृत्वदायी भूमिका बजावली. फ्रेंच आणि पोर्तुगीज राजवटीच्या पाँडिचेरी आणि गोवा या भूभागांतील जनतेचे स्वातंत्र्यलढे संघटित करण्यात आणि त्यांना पाठिंबा देण्यात पक्षाने सक्रिय भूमिका बजावली. कामगार, शेतकरी आणि विद्यार्थी लढ्यांच्या आणि आझाद हिंद सेनेच्या कैद्यांच्या सुटकेच्या मागण्यांच्या या लाटेने नवे शिखर गाठले, ते १९४६च्या आरमारी बंडात. फॅसिझमचा पराभव आणि राष्ट्रीय मुक्ती संग्रामांची वाढती लाट ह्या आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीमध्ये, जनतेच्या या उठावाला सामोरे जावे लागलेली ब्रिटिश साम्राज्यशाही आणि काँग्रेस व मुस्लीम लीग हे देशातील महत्त्वाचे भांडवलदारी पक्ष यांनी तडजोड घडवली. परिणामी, देशाची फाळणी करण्यात आली आणि भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे भांडवलदार-जमीनदारवर्गांच्या नेतृत्वाखाली अस्तित्वात आली. राष्ट्रीय चळवळ ही मुख्यत: भांडवलदारवर्गाच्या नेतृत्वाखाली असल्यामुळे ही तडजोड होण्यास मदत झाली. अशाप्रकारे, मुख्यत: परकीय साम्राज्यवादी राजवटीविरुद्ध असलेला सार्वत्रिक राष्ट्रीय संयुक्त मोर्चाचा टप्पा संपुष्टात आला.

**१.८** देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही कम्युनिस्ट पक्षाला दडपशाहीला तोंड द्यावे लागले. १९४८ ते १९५२च्या काळात काँग्रेस राज्यकर्त्यांनी पक्षावर, विशेषत: तेलंगणमध्ये, केलेले उग्र हल्ले, वारंवार केलेली दडपशाही, पश्चिम बंगाल व त्रिपुरामधील निम-फॅसिस्ट दहशतशाहीचा काळ, केरळमधील पक्ष कार्यकर्त्यांवरील खुली हल्ले, तसेच देशाच्या इतर भागांतील दडपशाही,

या सर्वांवर मात करून क्रांतिकारी आंदोलन पुढे नेण्यात पक्ष अढळ राहिला. देशाच्या एकतेला फुटीर व विघटनवादी चळवळींमुळे धोका निर्माण झाला असताना, जनतेच्या ऐक्याचे रक्षण करण्यासाठी चाललेल्या लढ्यांमध्ये पक्ष अग्रभागी राहिला. पंजाब, त्रिपुरा, आसाम, पश्चिम बंगाल व काश्मीरमधील फुटीर आणि विघटनवादी शक्तींविरुद्ध लढताना शेकडो धैर्यवान पक्ष कार्यकर्त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले.

**१.९** अशा प्रकारे पक्षस्थापनेपासून कम्युनिस्ट चळवळीने भारतीय राजकारणात पुरोगामी भूमिका बजावली आहे. तिचा जनआधार, लोकप्रिय अपील आणि भांडवलदारी-जमीनदारी राजवटीच्या धोरणांना पर्यायी अशी तिची धोरणे, यांमुळे कम्युनिस्ट चळवळ ही देशाच्या राजकीय आणि सार्वजनिक जीवनातील एक महत्त्वाची शक्ती बनली आहे. १९५७ मधील केरळच्या पहिल्या कम्युनिस्ट मंत्रिमंडळाने आणि नंतर पश्चिम बंगाल, केरळ व त्रिपुरा येथे भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) आणि डाव्या आघाडीच्या सरकारांच्या लागोपाठ आलेल्या राजवटींनी, कम्युनिस्ट पक्ष जनताभिमुख धोरणे कशी अंमलात आणतो हे दाखवून दिले. ह्या सरकारांनी प्रचलित चौकटीमध्ये भूमिसुधारणा अंमलात आणल्या, सत्तेचे विकेंद्रीकरण केले आणि पंचायती पद्धतीचे पुनरुज्जीवन केले, श्रमिक जनतेला लोकशाही हक्कांची निश्चिती दिली आणि पर्यायी धोरणांसाठी लढा करीत असलेल्या देशातील जनवादी शक्तींना शक्तिशाली बनविले. खडतर लढ्यांच्या या काळात पक्षाने भरीव स्वरूपाची यश:सिद्धी नोंदविली. आपले यश व अपयश यांचे आत्मटीकात्मक विश्लेषण करण्यास बांधील असलेला पक्ष म्हणून, तो नेहमीच आपल्या चुकांपासून बोध घेण्याचा आणि आपल्या समाजातील ठोस परिस्थितीला मार्क्सवाद-लेनिनवाद लागू करण्याची आपली क्षमता सुधारण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतो.

**१.१०** दुरुस्तीवादाविरुद्ध प्रदीर्घ संघर्ष करून भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) स्थापन झाला. १९६४ साली त्याने आपला पक्ष कार्यक्रम मंजूर केला आणि नंतरच्या काळात त्या आकलनावर आधारित असलेली आपली रणनीती व डावपेच यांचे दुरुस्तीवाद व पोथीवाद या दोहोंपासून रक्षण केले. विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात सोव्हिएत युनियन, इतर समाजसत्तावादी देश व जागतिक कम्युनिस्ट चळवळ यांना मोठ्या पिछेहाटींना सामोरे जावे लागले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय घटनांचे आणि चळवळीच्या अनुभवांचे पुनर्मूल्यांकन



करणे आवश्यक झाले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या अर्धशतकामध्ये भारतातही महत्त्वाचे बदल व घटना घडल्या आहेत. भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) १९६४ नंतरच्या या घटनांचा आणि अनुभवांचा फेरआढावा घेऊन आपला पक्ष कार्यक्रम अद्ययावत केला आहे.

**१.११** क्रांतिकारी आंदोलनाच्या आजच्या टप्प्याला क्रांतिकारी शक्तींना रणनीतीचे जे उद्दिष्ट गाठावयाचे आहे, ते भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) भारतीय जनतेसमोर ठेवीत आहे. समाजसत्तावादी समाजाचे उद्दिष्ट गाठण्यामधील एक पाऊल म्हणून, जनतेची लोकशाही स्थापण्यासाठी राज्यकर्त्यावर्गाविरुद्ध कामगार, शेतकरी, श्रमिक जनतेचे सर्व विभाग आणि पुरोगामी लोकशाहीवादी शक्ती यांनी करावयाच्या लढ्यामध्ये मार्गदर्शक ठरेल असा कार्यक्रम पक्ष समोर ठेवीत आहे.

## २
## समकालीन जगातील समाजसत्तावाद

**२.१** विसाव्या शतकात जगामध्ये अभूतपूर्व बदल घडले. हे शतक साम्राज्यशाहीविरोधी लढ्यांचे शतक राहिले आहे. ह्या शतकाने मोठ्या क्रांतिकारी घटना पाहिल्या आहेत. त्यांची सुरुवात रशियात १९१७च्या ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीने झाली. दुसऱ्या महायुद्धातील फॅसिझमविरोधी विजयात सोव्हिएत युनियनने जी निर्णायक भूमिका बजावली, ती एक अतिमहत्त्वाची घटना होती. ऐतिहासिक चीनी क्रांती, क्रांतिकारी शक्तींचे व्हिएतनाम, कोरिया व क्यूबामधील विजय आणि पूर्व युरोपमधील समाजसत्तावादी राष्ट्रांची स्थापना, हे साम्राज्यवाद व समाजसत्तावाद यांच्यामधील अतिमहाकाय संघर्षाचे फळ होते. हे शतक वसाहतींना राजकीय स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या राष्ट्रीय मुक्ती संग्रामांचेही शतक होते. मार्क्सवाद-लेनिनवादाच्या तत्त्वज्ञानाने अंदाज केल्याप्रमाणे, ह्या विजयांनी जागतिक इतिहासात एक नवे पर्व निर्माण केले. ह्या शतकातील क्रांतिकारक घटना आणि विज्ञान व तंत्रज्ञानामधील मोठी प्रगती, यांनी ह्यापूर्वी कधीही कल्पना केली नसेल अशा प्रमाणावर, मानवसमाजाचा विकास होण्याच्या अतिभव्य शक्यता खुल्या केल्या.

**२.२** समाजसत्तावादी व्यवस्था स्वीकारलेल्या देशांनी एक नवीन मार्ग

उद्दीपित केला. सोव्हिएत युनियनच्या स्थापनेमुळे मानवी इतिहासात प्रथमच श्रमिक जनता वर्गीय शोषणापासून मुक्त अशा समाजात राहू शकली. झपाट्याचे औद्योगिकीकरण, सरंजामदारी अवशेषांचे निर्मूलन आणि अर्थव्यवस्था, संस्कृती व विज्ञान यांमध्ये सर्वांगीण प्रगती, यांच्या परिणामी प्रचंड बहुसंख्य जनतेला एक नवीन जीवन लाभले आणि श्रमिकांच्या हाती सत्ता आली. दारिद्र्य आणि निरक्षरता यांचे उच्चाटन, बेरोजगारीचे निर्मूलन, आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण या क्षेत्रांमध्ये सामाजिक सुरक्षिततेचे महाजाल आणि विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांतही प्रचंड झेप, ह्या समाजसत्तावादी देशांच्या नवीन पथनिर्देशक यश:सिद्धी होत्या. ज्या समाजांमध्ये अद्याप भांडवलशाही फारशी विकसित झाली नव्हती, आणि जे सापेक्षतया मागासलेले होते, तेथे ही लक्षणीय प्रगती नोंदविली गेली. सामाजिक-आर्थिक मागासलेपणावर मात करून, आणि साम्राज्यशाहीचे आक्रमण, सत्ता उन्मूलन व धमक्या यांचा सामना करून, अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये तेथे समाजसत्तावादाची उभारणी करावी लागली. सोव्हिएत युनियमधील या यश:सिद्धीचा परिणाम भांडवलदारी देशांवरही झाला. तेथील राज्यकर्त्यावर्गांना स्वत:च्या नागरिकांसाठी कल्याणकारी राज्याच्या नावाखाली सामाजिक सुरक्षिततेच्या योजना सुरू करणे व त्यांचा विस्तार करणे भाग पडले.

**२.३** परंतु कसलेही मार्गदर्शक उदाहरण समोर नसताना, समाजसत्तावादाच्या उभारणीमध्ये सोव्हिएत युनियन व पूर्व युरोपातील इतर समाजसत्तावादी देशांनी काही गंभीर चुका केल्या. समाजसत्तावादाच्या उभारणीला लागणाऱ्या प्रदीर्घ काळाबाबतचे अयोग्य आकलन; पक्ष आणि शासन यांच्या भूमिकांबाबत चुकीची कल्पना; अर्थव्यवस्था व तिचे व्यवस्थापन यांत योग्य वेळी बदल करण्याबाबत अपयश; पक्षात, शासनात व समाजात समाजसत्तावादी लोकशाही खोलवर घेऊन जाण्यात आलेले अपयश; नोकरशाहीमध्ये झालेली वाढ आणि वैचारिक जाणीवेला लागलेली धस; यांमध्ये या चुकांचा उगम होता. यामुळे समाजसत्तावाद उलथून पाडण्याचे साम्राज्यशाहीचे सततचे प्रयत्न सुकर झाले. पण या विकृतींमुळे मार्क्सवाद-लेनिनवादाची वैधता अजिबात नष्ट होत नाही; उलट, त्यांमधून क्रांतिकारी तत्त्वज्ञान व व्यवहार यांत झालेली फारकत दिसून येते. सोव्हिएत युनियन व इतर समाजसत्तावादी देशांचे विघटन आणि पूर्व युरोपमधील पिछेहाट, यांमुळे नवी परिस्थिती निर्माण



झाली. विसाव्या शतकाच्या अखेरीस समाजसत्तावादी शक्तींना, पुन्हा एकदा जास्त धिटावलेल्या साम्राज्यशाहीने दिलेल्या आव्हानाला सामोरे जावे लागले. ही पिछेहाट झालेली असताही, कम्युनिस्ट चळवळ व क्रांतिकारी शक्ती या चुकांपासून बोध घेतील, आपली शक्ती पुनर्संघटित करतील आणि साम्राज्यशाही व इतर प्रतिगामी शक्तींच्या आक्रमक आव्हानाला तोंड देतील, याचा भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)ला गाढ विश्वास आहे.

**२.४** ही वळणे आणि आडवळणे, यश आणि अपयश असताही, विसाव्या शतकातील घटनांमधून, विशेषत: १९१७ नंतरच्या घटनांमधून, समाजसत्तावाद आणि मानवी प्रगतीच्या उत्क्रांतीसाठी चाललेल्या जनतेच्या लढ्यांचा प्रभावशाली परिणाम दिसून येतो. क्रांतिकारी परिवर्तनांमुळे इतिहासात गुणात्मक उड्डाणे घेतली गेली आहेत आणि त्यांनी आधुनिक संस्कृतीवर आपला कधीही न पुसला जाणारा ठसा उमटविला आहे. सामाजिक मुक्तीची आणि सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया ही दीर्घ काळ चालणारी आणि गुंतागुंतीची प्रक्रिया असेल. भांडवलशाहीमधून समाजसत्तावादात होणारे परिवर्तन हे एका घावात होणारे परिवर्तन नसून, राजकीय सत्ता काबीज केल्यावरही प्रदीर्घ काळ चालणारा तो एक अत्यंत तीव्र स्वरूपाचा वर्गावर्गांमधील लढा असतो, हे इतिहासाने दाखवून दिले आहे.

**२.५** जागतिक भांडवलशाही मानवसमाजासमोरील मूलभूत प्रश्न सोडवू शकत नाही. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीचा वापर केल्यामुळे उत्पादक शक्तींमध्ये झालेल्या प्रचंड वाढीच्या परिणामी, विकसित भांडवलदारी देशांमध्ये रोजगार न वाढता, उत्पन्न आणि संपत्ती यांमधील विषमता अति तीव्रतेने वाढविणारा विकास झाला आहे. त्यामुळे वरकड मूल्याचा वाढीव दर गिळंकृत केल्याने होणारे कामगारांचे शोषण जास्त तीव्र झाले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानातील ह्या प्रगतीचा वापर संपत्ती आणि साधनसामुग्री ही मूठभर व्यक्तींच्या आणि बहुराष्ट्रीय महामंडळांच्या हाती कायमची केंद्रित करण्यासाठी केला जात आहे. साम्राज्यशाही ही एक लुटारू व विनाशकारी पद्धती आहे हे सिद्ध झाले आहे. विसाव्या शतकात तिने मानवसमाजाला लक्षलक्षावधी लोकांच्या प्राणांची किंमत मोजणाऱ्या दोन रानटी जागतिक युद्धांमध्ये लोटून दिले. शस्त्रास्त्रनिर्मिती करणारा उद्योगधंदा हे विकसित भांडवलदारी अर्थव्यवस्थांचे एक अविभाज्य अंग बनले आहे. त्यातून त्यांना एकूण मागणी सतत तरंगती

ठेवता येते. शासनाने आपले अंग काढून घ्यावे, ह्या नवउदारमतवादी उपाययोजनांमुळे सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजना यांत भयानक स्वरूपाची काटछाट करण्यात येते. रोजगारविहीन विकास, कामगारांची हंगामी नेमणूक आणि कमाई व संपत्तीमधील वाढती विषमता, हे भांडवलदारी समाजाचे एक ठळक वैशिष्ट्य झाले आहे. वित्तव्यवस्थेचे चंचल स्वरूप, विकसित भांडवलदारी देशांतील कुंठित आणि अल्प स्वरूपाचे विकास दर आणि साधनसामुग्रीच्या वापरामधील वाढती तर्कहीनता व उधळपट्टी, ही सर्व भांडवलदारी व्यवस्थेतील अंगभूत अरिष्टाची लक्षणे आहेत. बहुराष्ट्रीय महामंडळांची नफे कमावण्यासाठी चाललेली लुटारू मोहीम आणि धनिक देशांनी चालविलेला चंगळवाद, यामुळे जीवसृष्टीचा विनाश झाला आहे आणि जागतिक पर्यावरणाला, विशेषत: तिसऱ्या जगाच्या पर्यावरणाला, गंभीर धोका निर्माण झाला आहे. उत्पादनाचे सतत वाढते सामाजिकीकरण आणि वरकड मूल्याचा वाढता खाजगी अपहार, हा भांडवलशाहीमधील मूलभूत अंतर्विरोध जास्त तीव्र झाला आहे.

**२.६** वित्तीय भांडवलाचे केंद्रीकरण व आंतरराष्ट्रीयीकरण यांनी भांडवलशाहीच्या सध्याच्या टप्प्यामध्ये अभूतपूर्व उच्चांक गाठला आहे. जागतिक प्रमाणावर चलित राहिलेले वित्तीय भांडवल राष्ट्रांच्या सार्वभौमत्त्वावर हल्ला चढवित आहे आणि आपल्या अतीव नफ्याचा पाठपुरावा करताना या देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये अनिर्बंध प्रवेश मिळवण्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू आहेत. सम्राज्यवादी व्यवस्था ही सट्टेबाज वित्तीय भांडवलाच्या सेवेत असल्यामुळे त्याच्या मुक्त प्रवाहावर असलेली सर्व बंधने ती तोडून टाकते व जगातील प्रत्येक भागावर त्याला सोयीस्कर होतील अशा अटी लादते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक व जागतिक व्यापार संघटना ही अशी अन्याय्य वासाहतिक-कालोत्तर जागतिक व्यवस्था कायम करण्याची साधने बनली आहेत. सट्टेबाज वित्तीय भांडवलाच्या या नव्या वर्चस्वशाहीचा परिणाम विकसित भांडवलदारी देशांतील वाढीचा वेग कुंठित होण्यात होतो. तिसऱ्या जगासाठी तर त्याचा अर्थ जास्त तीव्र शोषण आणि वाढत्या कर्जाचे दुष्टचक्र हाच होतो. कमी विकसित भांडवलदारी देशांतील व्यापारामधील अटी, औद्योगिक आणि कृषी उत्पादन, तंत्रज्ञानाचा प्रवाह आणि सेवाक्षेत्रे, या सर्वांना साम्राज्यवादी भांडवलाच्या हितसंबंधांमध्ये चपखल बसतील अशा



तऱ्हेने राहावेच लागते. सम्राज्यशाहीने जगाचे दोन विभाग केले आहेत : धनिक विकसित भांडवलदारी देश आणि प्रचंड बहुसंख्य मानवसमाज राहात असलेले विकसनशील देश. धनिक व गरीब देश यांतील ही दरी विसाव्या शतकातील अखेरच्या दोन दशकांत प्रचंड प्रमाणावर वाढत गेली. साम्राज्यशाही दामटत असलेल्या जागतिकीकरणामुळे ती आणखीच रुंदावली आहे.

**२.७** जुन्या पद्धतीच्या वसाहतवादाच्या अंतानंतर साम्राज्यशाही जी नववसाहतवादी रणनीती पुढे रेटत होती, तिने आता सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्यावर, आपले जागतिक वर्चस्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न जास्त तीव्र केले आहेत. अमेरिकन साम्राज्यशाही आपल्या आर्थिक, राजकीय आणि लष्करी ताकदीचा वापर आपले वर्चस्व स्थापण्यासाठी आक्रमकपणे करीत आहे. नाटोचा विस्तार करून आणि जगभर लष्करी हस्तक्षेप करून, साम्राज्यशाही पुढे दामटत असलेल्या जागतिकीकरणाला जोड दिली जात आहे. शक्तींच्या समतोलात झालेल्या बदलामुळे प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागत असताही, चीन, व्हिएतनाम, क्यूबा, कोरिया व लाओस हे समाजसत्तावादी देश समाजसत्तावादाच्या ध्येयाशी सातत्याने बांधील राहिले आहेत. सध्याच्या समाजसत्तावादी राजवटी उलथून पाडण्यासाठी साम्राज्यशाही सतत कार्यरत आहे, आणि ती त्यांच्याविरुद्ध वैचारिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांत अविरतपणे युद्ध चालवित आहे. जागतिक दळणवळणातील क्रांतीचा वापर करून साम्राज्यशाही आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांवरील आपल्या नियंत्रणाचा फायदा घेते व आक्रमक पद्धतीने भांडवलशाहीविरोधी संकल्पनांची आणि समाजसत्तावादाची नाचक्की करून त्यांना दडपण्याचा प्रयत्न करते.

**२.८** विसाव्या शतकाच्या अखेरीस आंतरराष्ट्रीय शक्तींच्या समतोलात साम्राज्यशाहीच्या बाजूने बदल झाला असला आणि भांडवलशाहीने नवीन वैज्ञानिक व तंत्रज्ञानात्मक प्रगतीचा वापर करून उत्पादक शक्तींचा विकास करणे सुरू ठेवले असले, तरीदेखील ती अरिष्टग्रस्त व्यवस्थाच राहिली आहे. शिवाय ती जुलुम, शोषण व अन्यायाची व्यवस्था राहिली आहे. समाजसत्तावाद हाच भांडवलशाहीला एकमेव पर्याय आहे. म्हणूनच, आजच्या युगाचा मध्यवर्ती सामाजिक अंतर्विरोध हा साम्राज्यवाद व समाजसत्तावाद यांच्यामधील अंतर्विरोध आहे. आजच्या नव-उदारमतवादी जागतिक आक्रमणामुळे साम्राज्यवादी देश आणि तिसऱ्या जगातील देश यांच्यामधील अंतर्विरोध झपाट्याने तीव्र

होत असून तो आता पुढे येत आहे. भांडवलशाहीतील विषम विकासामुळे साम्राज्यवादी देशांमधील आपसांतील अंतर्विरोध चालूच राहिले आहेत. कामगार आणि भांडवल यांच्यामधील अंतर्विरोध आजच्या भांडवलशाहीच्या वर उल्लेखलेल्या वैशिष्ट्यांमुळे जास्त तीव्र होत आहे. हे सर्व अंतर्विरोध चिघळत रहाणे सुरूच आहे आणि जागतिक घटनांवर ते आपला प्रभाव पाडत असतात.

**२.९** साम्राज्यशाही आणि तिची शोषक समाजव्यवस्था यांविरुद्ध अविरत संघर्ष करण्यासाठी कामगारवर्ग आणि त्याचे पक्ष यांना वैचारिक, राजकीय आणि संघटनात्मकदृष्ट्या आपली तयारी करावी लागेल. साम्राज्यशाहीविरुद्ध लढण्यासाठी, आणि सध्याची अन्याय्य जागतिक व्यवस्था टिकवून धरून ती कायम ठेवण्यासाठी जे राज्यकर्तेवर्ग प्रयत्नशील आहेत त्यांचा पराभव करण्यासाठी, जगभरच्या डाव्या, जनवादी आणि पुरोगामी शक्तींची एकजूट घडवलीच पाहिजे. सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवादावर आधारित असलेला पक्ष म्हणून साम्राज्यवादी वर्चस्वाविरुद्ध लढण्यास भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) बांधील आहे आणि जगभर ज्या शक्ती साम्राज्यवाद-पुरस्कृत जागतिकीकरणाच्या आर्थिक व्यवस्थेविरुद्ध आणि शांतता, लोकशाही आणि समाजसत्तावाद यांसाठी लढत आहेत, त्या सर्वांशी तो आपला भ्रातृभाव व्यक्त करीत आहे.

## ३
## स्वातंत्र्यप्राप्ती आणि नंतर

**३.१** भारतीय जनतेच्या व्यापक विभागांनी मोठ्या उत्साहाने स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला व तो यशस्वी केला. देशभक्तीच्या भावनेने त्यांना उद्दीपित केले होते आणि स्वतंत्र भारत व जनतेसाठी नवजीवन यांकडे त्यांची दृष्टी लागली होती. दारिद्र्य आणि शोषण यांमुळे होणाऱ्या हलाखीच्या परिस्थितीचा अंत व्हावा ही त्यांची अपेक्षा होती. त्यांच्या लेखी स्वातंत्र्य म्हणजे जमीन, अन्न, रास्त वेतन, निवारा, शिक्षण, आरोग्यसेवा आणि रोजगार हे होते. स्वातंत्र्य म्हणजे जातपातवाद आणि धर्मांध विद्वेष यांसारख्या दुष्ट सामाजिक प्रथांपासून मुक्तता आणि जनवादी चौकटीमध्ये जनतेच्या सांस्कृतिक गरजांची पूर्तता हे होते.



**३.२** स्वातंत्र्यासाठी चाललेली राष्ट्रीय चळवळ यशस्वी झाली, याचे कारण कामगारवर्ग, शेतकरी, मध्यमवर्ग, बुद्धिजीवी, महिला, विद्यार्थी आणि युवक यांचा त्यात प्रचंड सामुदायिक प्रमाणावर सहभाग होता. परंतु लढ्याचे नेतृत्व मात्र भांडवलदारवर्गाच्या हाती राहिले. नव्या शासनाच्या नेतृत्त्वपदी असलेल्या बड्या भांडवलदारवर्गाने लोकशाही क्रांतीची मूलभूत कार्ये पूर्णत्वाला नेण्यास नकार दिला. उत्पादक शक्तींवरील बंधने तोडून टाकण्यातच भारतीय समाजाच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग होता. बांडगुळी पद्धतीची जमीनदारशाही नष्ट करावयास हवी होती आणि शेतमजूर व गरीब शेतकरी यांना जमिनीचे वाटप करून द्यायला हवे होते. गुदमरून टाकणाऱ्या परदेशी भांडवलाच्या वर्चस्वापासून उद्योगधंदे मुक्त केल्याने, प्रगत औद्योगिक राष्ट्र व त्याची आत्मनिर्भर अर्थव्यवस्था यांचा पाया घातला गेला असता. पण लोकशाही क्रांतीच्या कार्यांची पूर्णत्वाने कार्यवाही केल्याने जे परिणाम होणे शक्य होते, त्यांची बड्या भांडवलदारांना भीती असल्यामुळे त्यांनी जमीनदारांशी युती केली आणि साम्राज्यवाद्यांशी तडजोड केली. काँग्रेस राज्यकर्त्यांच्या धोरणांमध्ये भांडवलदार-जमीनदारवर्गाच्या या युतीचे प्रतिबिंब दिसत होते. त्यानंतरच्या दशकांमधील भांडवली मार्गाचे स्वरूप हे राज्यकर्त्यावर्गांच्या ह्या स्वरूपाने निर्धारित झाले.

**३.३** देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या प्रचंड साधनसामुग्रीची देणगी भारताला लाभली आहे. मुबलक पिकाऊ जमीन, सिंचन क्षमता, वेगवगळ्या प्रदेशांत विविध प्रकारच्या पिकांसाठी पोषक परिस्थिती, प्रचंड प्रमाणावर खनिज संपत्ती, तसेच ऊर्जा निर्मितीची प्रचंड क्षमता, ही सारी भारताला उपलब्ध आहेत. त्याच्यापाशी प्रचंड श्रमशक्ती आणि वैचारिक, तंत्रज्ञानात्मक, व्यवस्थापकीय व बौद्धिक कौशल्य यांच्या मोठ्या क्षमतेचा साठाच आहे. या साऱ्या क्षमतांचा विकास करण्याऐवजी, राजसत्ता हाती घेतलेल्या बड्या भांडवलदारवर्गाने आपल्या संकुचित हितसंबंधांना पोषक असा भांडवली विकासाचा मार्ग स्वीकारला.

**३.४** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साम्राज्यशाहीला एकीकडे विरोध आणि दुसरीकडे सहकार्य यांमधून भांडवलदारवर्गाचे दुहेरी स्वरूप स्पष्ट झाले. शासनावर नेतृत्व मिळवलेल्या बड्या भांडवलदारवर्गाने एका विशिष्ट पद्धतीचा भांडवली विकासाचा मार्ग स्वीकारला. त्याने साम्राज्यशाहीशी तडजोड केली आणि

जमीनदारशाहीशी युती टिकवून धरली. शासनावरील आपल्या पकडीचा वापर करून स्वत:चे स्थान बळकट करण्यासाठी त्याने एका बाजूला जनतेवर हल्ले केले आणि दुसऱ्या बाजूला साम्राज्यशाही व जमीनदारवर्ग यांच्याशी असलेले संघर्ष व अंतर्विरोध सोडवण्यासाठी दबाव, सौदेबाजी व तडजोड या मार्गांचा अवलंब केला. ह्या प्रक्रियेमध्ये त्याने परदेशी मक्तेदारांशी दृढ संबंध जोडले आणि जमीनदारवर्गाशी सत्तेत भागीदारी केली. उदारीकरणाच्या धोरणांतून बडा भांडवलदारवर्ग देशाची अर्थव्यवस्था परदेशी भांडवलाला खुली करून देण्याचा आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाशी मजबूत दुवा साधण्याचा सर्वात प्रबळ पुरस्कर्ता आहे. सार्वजनिक क्षेत्राचे आणि एकूणच अर्थव्यवस्थेचे खाजगीकरण करण्याच्या मागणीच्या मागे सर्वाधिक चेतना त्याचीच आहे.

**३.५** स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये पाश्चात्य देशांबरोबर न्याय्य सौदा करण्यात अपयश आल्यामुळे, भारतीय भांडवलदारवर्गाने मदतीसाठी सोव्हिएत युनियनकडे मोर्चा वळविला. त्याने भांडवली विकासाचा जो मार्ग स्वीकारला, तो शासनपुरस्कृत भांडवलशाहीचा होता. साम्राज्यवादी आणि समाजसत्तावादी असे जे दोन गट त्यावेळी अस्तित्वात होते, त्यांचा स्वत:चे स्थान मजबूत करण्यासाठी सौदेबाजीचा घटक म्हणून वापर करण्यास त्याने सुरुवात केली. भांडवली विकासमार्गाचा एक भाग म्हणून त्याने आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला. त्याची अर्थसंकल्पीय आणि सर्वसाधारण आर्थिक धोरणे ही मुख्यत: शोषकवर्गातील एका संकुचित विभागावर मेहेरनजर करण्यासाठी होती. सार्वजनिक क्षेत्राद्वारे अवजड उद्योगधंदे व पायाभूत सुविधा यांचा त्याने विकास केला, कारण अशा प्रचंड प्रकल्पांसाठी आवश्यक असलेली साधनसंपत्ती गुंतवण्यास खाजगी क्षेत्र तेव्हा असमर्थ होते. म्हणूनच सार्वजनिक क्षेत्राच्या या उभारणीचा काही प्रमाणावर अर्थव्यवस्थेचे औद्योगिकीकरण करण्यास आणि साम्राज्यवादी मक्तेदारांवरील आपल्या अगतिक अवलंबित्वावर मात करण्यास उपयोग झाला.

**३.६** भारतासारख्या अर्धविकसित देशात भांडवलदारवर्गाच्या हाती असलेल्या शासनसंस्थेच्या आधारावर केलेल्या आर्थिक नियोजनामुळे निश्चितच भांडवली आर्थिक विकासाला एक विशिष्ट गती आणि दिशा मिळाली. कारण, त्यातून देशातील उपलब्ध साधनसामुग्रीचा, शासकीय धोरणांच्या मर्यादांखाली का होईना, सुयोग्य वापर होणे शक्य झाले. या नियोजनाचे एक अत्यंत ठळक



वैशिष्ट्य औद्योगिक विकासात आणि विशेषत: सार्वजनिक/शासकीय क्षेत्रातील विशिष्ट अवजड आणि मशीनबांधणी उद्योगांत दिसून आले. हे फायदे मिळवणे शक्य झाले, याचे कारण समाजसत्तावादी देशांकडून, मुख्यत: सोव्हिएत युनियनकडून, त्यांना मिळालेला अचल पाठिंबा. बँका व विमा यांसारख्या वित्तीय क्षेत्रांचे, तसेच तेल व कोळसा धंद्यांचे राष्ट्रीयीकरण केल्यामुळे शासकीय क्षेत्राचा विकास झाला.

**३.७** औद्योगिकीकरणासाठी काही इतर उपाययोजना, अर्ध्यामुर्ध्या का होईना, स्वीकारण्यात आल्या. संशोधन आणि विकास, नव्या पेटंट कायद्याला मंजुरी, आपल्या बाजारपेठेत परदेशी मालाच्या व भांडवलाच्या प्रवेशावर नियंत्रण आणि लघुउद्योगांना संरक्षण, यांवर भर देण्यात आला. भारतातील परिस्थितीनुरूप या सर्व योजनांमुळे, काही विशिष्ट प्रमाणात आर्थिक मागासलेपणावर आणि साम्राज्यवादी सत्तांवरील लाचार अवलंबित्वावर मात करण्यास, तसेच औद्योगिकीकरणाचा तंत्रज्ञानात्मक पाया उभारण्यास मदत झाली.

**३.८** सार्वजनिक क्षेत्राचा विकास आणि मर्यादित स्वरूपाच्या नियोजनात होणारा शासकीय हस्तक्षेप, यांबरोबरच एकामागून एक आलेल्या सरकारांनी राबविलेल्या धोरणांमुळे संपत्तीचे जास्तजास्त केंद्रीकरण झाले आणि मक्तेदारीची झपाट्याने वाढ झाली. बड्या भांडवलदारवर्गाच्या नेतृत्वाखाली खुद्द सार्वजनिक क्षेत्र भांडवली विकासाचे एक साधन बनले. सार्वजनिक वित्तीय संस्थांमधील कर्जाचा मोठा वाटा बड्या भांडवलदारवर्गाने स्वत:साठी लाटला. एकामागून एक आलेल्या सरकारांच्या अर्थसंकल्पीय आणि करविषयक धोरणांचा उद्देश जनतेकडून साधनसामुग्रीचे हस्तांतरण भांडवलदार-जमीनदारवर्गांच्या एका संकुचित विभागाकडे करणे हा होता. मोठ्या प्रमाणावरील करचुकवेगिरीमुळे प्रचंड प्रमाणावर काळ्या पैशाची निर्मिती झाली आणि खाजगी संपत्तीचा संचय करण्याची ती एक पद्धत झाली. भांडवली विकास योजनांना वित्तपुरवठा करण्याच्या नावाखाली सामान्य जनतेला, कामगार, शेतकरी व मध्यमवर्गांना, निर्दय शोषणाला तोंड द्यावे लागले. मूलभूत भूमिसुधारणांच्या अभावामुळे देशांतर्गत बाजारपेठ मर्यादित राहिली आणि परदेशी भांडवलावर अवलंबून राहिल्याशिवाय देशी उद्योगधंदे वाढू शकले नाहीत व त्यांचा विकास होऊ शकला नाही. प्रचंड प्रमाणावरील परकीय व देशांतर्गत कर्जामधून शासकीय भांडवलशाहीच्या या प्रकाराला वित्तपुरवठा झाला. मक्तेदारीची वाढ आणि

परदेशी भांडवलाचा वाढता शिरकाव हे ह्या मार्गाचे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य ठरले.

**३.९** राज्यकर्त्यावर्गांनी पन्नाशीच्या दशकापासून स्वीकृत केलेल्या ह्या विशिष्ट भांडवली विकासमार्गामुळे अर्थव्यवस्था अरिष्टग्रस्त होऊन कुंठितावस्था निर्माण होणे अपरिहार्य होते. बड्या भांडवलदारवर्गाने जमीनदारवर्गाशी केलेल्या तडजोडीमुळे देशांतर्गत बाजारपेठ विकसित होऊ शकली नाही, कारण शेतकऱ्यांची क्रयशक्ती पुरेशा प्रमाणावर वाढू शकली नाही. औद्योगिकीकरणास वित्तपुरवठा करण्यासाठी देशी आणि परदेशी दोन्ही प्रकारच्या कर्जांवर वाढते अवलंबित्व आणि शासनाचा खर्च यांमुळे परदेशी व्यापार आणि वित्तीय तूट या दोहोंमध्ये गंभीर अरिष्टाची परिस्थिती निर्माण झाली. या वित्तीय अरिष्टामुळे अखेर काँग्रेस सरकारला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी-जागतिक बँकेच्या अटी स्वीकाराव्या लागल्या. ह्या अरिष्टाला तोंड देण्यासाठी बड्या भांडवलदारवर्गाने परदेशी वित्तीय भांडवलाशी वाढते सहकार्य करण्याचा आणि आपली अर्थव्यवस्था खुली करण्याचा मार्ग स्वीकारला.

**३.१०** बड्या भांडवलदारवर्गाने पूर्वी आपल्या दुर्बल भांडवली पायामुळे भांडवलदारी विकासासाठी लागणाऱ्या पायाभूत सोयी उभारण्यासाठीसुद्धा शासकीय हस्तक्षेप स्वीकारला होता. अनेक दशकांनंतर त्यांच्याकडे पुरेसा भांडवलसंचय झाला आणि सरकारी मदतीमुळे झालेला विकास व सब्सिडी यांमधून त्याने आपले उखळ पांढरे केले. ऐंशीच्या दशकाच्या मध्यास बडा भांडवलदारवर्ग, सरकारसाठी राखून ठेवलेल्या गाभाक्षेत्रात प्रवेश करण्यास, सार्वजनिक क्षेत्र हाती घेण्यास आणि परदेशी भांडवलाच्या सहकार्याने नव्या क्षेत्रांत स्वत:चे स्थान विकसित करण्यास सज्ज झाला. याबरोबरच शासन-पुरस्कृत भांडवली विकासमार्गात उद्भवलेल्या अरिष्टामधून उदारीकरणाचा अंतर्गत पाया निर्माण झाला. देशाबाहेर, सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्यामुळे पूर्वीच्या धोरणांमध्ये बदल करण्याच्या आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी-जागतिक बँकेच्या आदेशांना मान्यता देण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली.

**३.११** अर्थव्यवस्था खुली करून उदारीकरण आणण्याच्या दबावामुळे ऐंशीच्या दशकाच्या मध्यापासून, राजीव गांधी राजवटीच्या काळात आर्थिक धोरणांत बदल घडून आला. आयातीचे उदारीकरण व वाढत्या प्रमाणावरील



अल्प मुदतीची कर्जे यांमुळे प्रचंड वित्तीय तूट निर्माण झाली. त्याबरोबरच आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील बदलांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत १९९१ साली काँग्रेस सरकारला संरचनात्मक फेरजुळणीच्या कर्जासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी-जागतिक बँकेच्या अटी मान्य कराव्या लागल्या. भाजप सरकारने सत्तेवर येताच उदारीकरणाची धोरणे आणखी पुढे दामटली. १९९१ पासून एकामागून एक सत्तेवर आलेल्या सर्व सरकारांनी उदारीकरण आणि संरचनात्मक फेरजुळणीची धोरणे अंमलात आणल्यामुळे अर्थव्यवस्था परदेशी भांडवलाला खुली करून देणे, सार्वजनिक क्षेत्र मोडीत काढणे आणि आयातीचे उदारीकरण करणे सुरू झाले. जी क्षेत्रे आजवर शासकीय/सार्वजनिक क्षेत्र यांसाठी राखीव ठेवली होती, ती देशीविदेशी मक्तेदार-भांडवलदारांना खुली करून देण्यात आली. सार्वजनिक क्षेत्र पूर्णपणे मोडीत काढण्यासाठी त्यातील उद्योगधंद्यांचे समभाग विक्रीस काढण्यात आले व ते खाजगी मक्तेदारांना कवडीमोलाने विकले गेले. आयातीवरील कर कमी केला गेल्यामुळे देशी उत्पादनांची जागा परदेशी मालाने घेतली. परिणामी, मोठ्या प्रमाणावर कारखानेबंदी झाली आणि हजारो कामगार रस्त्यावर फेकले गेले. वित्तीय क्षेत्र खुले करून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाने अथक दबाव आणला. बँकिंग क्षेत्राच्या खाजगीकरणाची प्रक्रिया आणि विमा क्षेत्र खुले करणे यांना अग्रक्रम देण्यात आला. १९९४ मध्ये गॅट करारावर सही केल्यामुळे भारताला जागतिक व्यापार संघटनेच्या राजवटीला मान्यता द्यावी लागली. पेटंट कायद्यात बदल आणि सेवाक्षेत्र खुले करून देणे, हे साम्राज्यवादी भांडवलाच्या हिताला पोषक ठरले. या सर्व धोरणांचा परिणाम देशाच्या आर्थिक सार्वभौमत्वाला धस लागण्यात झाला आहे.

**३.१२** उदारीकरण व खाजगीकरण यांमुळे बड्या भांडवलदारवर्गाला प्रचंड फायदा झाला आहे. त्यांच्यात नवनव्या औद्योगिक घराण्यांचा प्रवेश झाल्यामुळे त्यांची संख्याही वाढली आहे. सर्वोच्च २२ मक्तेदारी घराण्यांची मालमत्ता १९५१ साली रु. ३१२.६३ कोटी होती, ती १९९७ मध्ये रु. १,५८,००४.७२ कोटी झाली, म्हणजे ५०० पट वाढली. उदारीकरणाखाली बड्या भांडवलदार घराण्यांना आणि धनिक विभागांना आयकराचे दर कमी करून आणि संपत्ती करासारखे इतर कर नष्ट करून, प्रचंड सवलती देण्यात आल्या आहेत. या धोरणांमुळे आधीच मातब्बर असलेल्या या वर्गांच्या

संपत्तीत अफाट प्रमाणात भर पडली आहे आणि त्यांच्या वापरातील चैनीच्या वस्तूंची बाजारपेठ वाढली आहे. ही मागणी पुरविण्यासाठी परदेशी भांडवलाच्या सहकार्याने या वस्तूंचे देशामध्ये उत्पादन केले जाते, अथवा त्या आयात केल्या जातात. परदेशी भांडवलाच्या बेदरकार प्रवेशामुळे महत्त्वाच्या क्षेत्रांतील देशी उद्योगांवर परिणाम होत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या भारतीय कंपन्या विकत घेत आहेत. काही बडे भांडवलदारेतर विभाग परदेशी भांडवलाशी सहकार्य करण्यास तयार असले तरी, मध्यम व छोट्या भांडवलदारांच्या मोठ्या विभागांना उदारीकरणाचा जबरदस्त फटका बसला आहे.

**३.१३** उदारीकरणाच्या या काळात परकीय तसेच देशांतर्गत कर्जातही वाढ झाली आहे. महसुली खर्चाचा बराच मोठा भाग केवळ व्याज भरण्यामध्ये खर्च होत आहे. सार्वजनिक भांडवल गुंतवणूक व खर्च कमी होत चालले आहेत, आणि त्यांचा परिणाम विकास कार्ये आणि दारिद्र्यनिर्मूलन योजनांवर होत आहे. उदारीकरणामुळे सामाजिक, आर्थिक आणि प्रादेशिक विषमतेमध्ये तीव्र वाढ झालेली दिसत आहे. अगदी अधिकृत आकड्यांप्रमाणेदेखील दारिद्र्यरेषेखालील जनतेच्या संख्येत, विशेषत: ग्रामीण विभागांत, वाढ झाली आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतींत, विशेषत: अन्नधान्यांच्या किंमतींत, सतत होत असलेल्या वाढीचा सर्वात जास्त फटका गरीब जनतेला बसत आहे. विशेषत:, सार्वजनिक वितरण व्यवस्थेत कपात केल्याच्या पार्श्वभूमीत हे जास्तच तीव्रतेने होत आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि कल्याणकारी योजना यांसारख्या सामाजिक क्षेत्रांवरील खर्चकपातीचा श्रमिक जनतेवर फारच घातक परिणाम झाला आहे.

**३.१४** भांडवलदारवर्ग व सरकार यांनी लादलेल्या या मोठ्या बोजाचा फटका कामगारवर्गाला बसला आहे. सतत वाढत चाललेल्या किंमतींमुळे कामगारांच्या वास्तव वेतनात वाढ होत नाही. औद्योगिक क्षेत्रांत गंभीर रूप धारण केलेल्या अरिष्टामुळे कामगारांना कारखानेबंदी आणि कामगारकपातीच्या हल्ल्यांना तोंड द्यावे लागत आहे. कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्याकरता म्हणून असलेले कामगार कायदे दोषास्पद आहेत आणि तेदेखील अंमलात आणले जात नाहीत. मालकांकडून होणारा कायद्यांचा भंग ही नित्याचीच बाब झाली आहे. गुप्त मतदानाने कामगार संघटनांना मान्यता आणि सामूहिक वाटाघाटींचा त्यांचा हक्क हे नाकारले जातात. उदारीकरण आणि खाजगीकरण



यांच्या हल्ल्यांमुळे लक्षावधी कामगार नोकरी गमावून बसले असून, त्यांना आधार मिळण्यासाठी कसलीही सामाजिक सुरक्षा योजना अस्तित्वात नाही. उदारीकरणाच्या धोरणाचा एक भाग म्हणून मजूर बाजारपेठेचे निर्नियंत्रण करण्याची मागणी केली जात आहे. कामगारांनी प्रदीर्घ काळपर्यंत लढे करून मिळविलेले फायदे व अधिकार आकुंचित केले जात आहेत. कायमस्वरूपी रोजगारांचे रूपांतर कंत्राटी अथवा हंगामी नोकऱ्यांमध्ये केले जात आहे. श्रमिक महिलांना कमी पगार देण्यात येतो आणि कामगारकपातीच्या त्या पहिल्या बळी ठरतात. बाल-कामगारांच्या संख्येत वाढ झाली आहे आणि त्यांना सर्वात भयानक प्रकारच्या शोषणाला तोंड द्यावे लागते. संघटित क्षेत्राबाहेरील लक्षलक्षावधी कामगारांना कामगार कायद्यांचे कसलेही संरक्षण मिळत नाही आणि सरकारने नेमून दिलेल्या किमान वेतनापासून त्यांना वंचित केले जाते. प्रचंड प्रमाणावरील असंघटित क्षेत्रामध्ये श्रमिक स्त्री-पुरुषांचे काम अत्यंत काबाडकष्टाचे असते. त्यांचे कामाचे तास प्रदीर्घ असतात, वेतन अत्यंत क्षुल्लक असते; बऱ्याच वेळा त्यांना कसल्याही सामाजिक सुरक्षेशिवाय धोकादायक परिस्थितीत काम करावे लागते. अशा तऱ्हेने अथक स्वरूपाचे काम आणि कामगारवर्गाचे शोषण यांमधूनच भांडवलदारवर्ग, बडे कंत्राटदार आणि बहुराष्ट्रीय महामंडळे यांचे नफे निर्माण होतात.

**३.१५** शेतीचा प्रश्न हा भारतीय जनतेसमोरील सर्वात महत्त्वाचा राष्ट्रीय प्रश्न राहिला आहे. त्याची सोडवणूक करण्यासाठी क्रांतिकारक बदल व्हावयास हवा. त्यात मूलभूत स्वरूपाच्या भूमिसुधारणांचा समावेश असला पाहिजे. त्यांचा रोख जमीनदारशाही, सावकारशाही आणि व्यापारी यांच्यामुळे होणारी पिळवणूक, तसेच जातपात व लिंगभेदावर आधारित ग्रामीण विभागांतील जुलुम-जबरदस्ती यांचे उच्चाटन हा असला पाहिजे. भारतातील भांडवलदार-जमीनदार वर्गीय राजवटीचा दिवाळखोरपणा हा, शेतीचा प्रश्न पुरोगामी जनवादी पद्धतीने हाताळण्यात, तो सोडवण्याचे तर दूरच राहिले, तिला आलेले अपयश, यासारखा इतर कोठेही दिसून येत नाही.

**३.१६** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जमीनदारशाही नष्ट करण्याऐवजी काँग्रेस राजकर्त्यांनी देशातील निमसरंजामी जमीनदारांचे रूपांतर भांडवली जमीनदारांमध्ये करण्याचे, तसेच धनिक शेतकऱ्यांचा एक स्तर विकसित करण्याचे धोरण अवलंबिले. पूर्वीच्या वैधानिक जमीनदारशाहीचे उच्चाटन, त्यांना प्रचंड प्रमाणावर

नुकसानभरपाई देऊन, शिवाय त्यांच्याकडील जमिनीचे मोठे भाग स्वत:कडे ठेवण्यास त्यांना परवानगी देणारे कायदे करून केले गेले. स्वत: कसणूक करण्याच्या नावाखाली जमिनीचा ताबा पुन्हा मिळविण्याचा हक्क देणाऱ्या कुळकायद्यांच्या अंमलबजावणीमुळे लक्षलक्षावदी कुळांना जमिनीवरून बेदखल करण्यात आले. पूर्वीच्या मोठमोठ्या जमिनींची मालकी तशीच चालू ठेवता यावी, म्हणून कमाल जमीनधारणा कायद्यांमध्ये भरपूर पळवाटा ठेवण्यात आल्या. लक्षलक्षावधी एकर वरकड जमीन एक तर ताब्यात घेतली गेली नाही, अथवा शेतमजुरांना किंवा गरीब शेतकऱ्यांना वाटून दिली गेली नाही. काँग्रेस पक्षाचा या बाबतीतील इतिहास म्हणजे ग्रामीण परिवर्तनासाठी असलेल्या या ऐतिहासिक संधीचा अत्यंत अभूतपूर्व असा विश्वासघात आहे. प्रचलित कायद्यांखालील भूमिसुधारणांची कार्यवाही केवळ भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)च्या नेतृत्वाखालील पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरा या डाव्या आघाडीच्या सरकारांनीच केली आहे.

**३.१७** काँग्रेस सरकारांची आणि त्यानंतरच्या सरकारांची शेतकीविषयक धोरणे ही जमीनदार व सधन शेतकरी यांना भांडवल गुंतवणुकीसाठी व सरकारी कर्जासाठी निधी उपलब्ध करून देण्यास तयार केली गेली आहेत. बँकांची कर्जे आणि सरकारी कर्जेही याच विभागांनी पटकाविली आहेत. साठीच्या दशकाच्या अखेरपासून तंत्रज्ञानांचा वापर, गहू आणि तांदूळ यांच्या बी-बियाण्यांमध्ये उच्च उत्पादक प्रतींच्या वापराची सुरुवात व रासायनिक खते, इत्यादींमुळे अन्नधान्यांच्या, तसेच इतर नगदी पिकांच्या, उत्पादकतेत वाढ झाली. शेतीक्षेत्रातील या वाढीबरोबरच वाढती विषमताही आली. भारताने अन्नधान्य उत्पादन जास्त वाढवले आणि त्याबाबतीत स्वयंपूर्ण होण्याची त्याची क्षमता होती, तरीही लक्षावधी लोक पुरेशा अन्नधान्याला वंचित राहिले आणि ते उपासमारी व कुपोषणाचे बळी झाले.

**३.१८** शेती-संबंधांमधील महत्त्वाची प्रवृत्ती म्हणजे ग्रामीण विभागांतील भांडवली संबंधांचा विकास. त्याची वैशिष्ट्ये म्हणजे: ग्रामीण श्रमिक जनतेच्या मोठ्या विभागांचे सर्वहाराकरण आणि ग्रामीण जनतेच्या प्रमाणातील शेतमजुरांच्या संख्येत प्रचंड वाढ; शेतकरीवर्गाचे वाढते स्तरीकरण; बाजारपेठेसाठी उत्पादन; आणि शेतीमध्ये व शेतीसंबंधित कार्यामध्ये ग्रामीण धनिकांकडून, विशेषत: जमीनदारांकडून, होणाऱ्या भांडवली पुनर्गुंतवणुकीची वाढलेली पातळी; यातून



यापूर्वी कधीही दिसून न आलेल्या प्रमाणावर भांडवलाच्या पुनरुत्पादनाचा पाया घातला गेला.

**३.१९** शेतीमध्ये भांडवली संबंधांचा विकास ही नि:संशयपणे सर्वात महत्त्वाची अशी अखिल भारतीय प्रवृत्ती आहे. त्याचबरोबर हेही तेवढेच स्पष्ट आहे की शेती-संबंधांमध्ये जसे मोठे प्रादेशिक आणि उपप्रादेशिक वैविध्य दिसून येते, तसेच ते उत्पादन आणि देवाणघेवाण या भांडवली संबंधांतील विषम विकासामध्येही दिसून येते. भारतामध्ये असे काही प्रदेश आहेत की जेथे शेतीमधील भांडवलशाही विकसित झाली आहे, आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर व्यापारी शेती व रोकडीचा व्यवहार यांचे वर्चस्व आहे. उलट असेही काही प्रदेश आहेत की जेथे जमीनदारशाही आणि कुळे यांचे जुने प्रकार आणि मजूर सेवा, गुलामी व वेठबिगारी यांचे अतिप्राचीन प्रकारदेखील अजूनही शेतीसंबंधांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. आणि सर्व देशभर जातपात-आधारित विभागणी व भयानक जुलुम-जबरदस्ती, लिंगभेद-आधारित जुलुम, आणि सावकार व व्यापारी भांडवलदार यांच्याकडून होणारे गरिबांचे शोषण, हे प्रकार आजही अविरतपणे चालू आहेत. भारतीय शेतीमधील भांडवली विकास जुन्या प्रकारांचे निर्धारपूर्वक निर्मूलन केल्याच्या पायावर झालेला नाही; तो भांडवलशाहीपूर्व उत्पादनसंबंधांच्या विसविशीत पायावर व सामाजिक संघटनेच्या प्रकारांवर भांडवलदारी संबंध लादून झालेला आहे. ''आधुनिका'' च्या विकासाने भारतात चालू असलेल्या जुन्यापुराण्या पद्धती नष्ट केलेल्या नाहीत. भांडवलशाही अनेकविध मार्गांनी शेती आणि ग्रामीण समाजामध्ये शिरकाव करते, या नियमाचे भारत हे एक अतिप्रचंड आणि जिवंत उदारहण आहे.

**३.२०** स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पाच दशकांमध्ये भांडवलदार-जमीनदारवर्गांच्या शेतीविषयक धोरणांच्या परिणामी भारतातील ७० टक्के शेतकरी आजही गरीब शेतकरी आणि शेतमजूर आहेत. उत्पादक मालमत्तेचा अभाव, अत्यंत अल्प कमाई आणि हलाखीचे जीवन, ही त्यांच्या सामूहिक दारिद्र्याची वैशिष्ट्ये आहेत. भारतातील ग्रामीण दारिद्र्याच्या अपर्याप्त व्याप्तीला जगातील इतर देशांत कोठेही तोड नाही. अगदी सरकारी आकड्यांप्रमाणेदेखील, ग्रामीण भारतातील २८ कोटी ५० लक्षाहून जास्त जनता, स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाल्यानंतरही, दारिद्र्यरेषेखाली जिणे कंठित आहे. दारिद्र्याच्या व्याप्तीची अनेक परिमाणे आहेत. ती केवळ कमाईतील हलाखीपुरतीच मर्यादित

नाहीत. जनसमूहांच्या बाबतीत ती अनेकविध अंगांनी प्रकट होतात. ग्रामीण गरिबांचा जमिनीवरील व अन्य उत्पादनसाधनांवरील हक्क अत्यंत अल्प आहे, अथवा नाहीच. जमिनीचे केंद्रीकरण आणि मालकी हक्कांतील विषमता, फारसे बदल न होता, आजही चालू आहेत. त्याच्याच जोडीला सिंचनाच्या पाण्याचेही असेच केंद्रीकरण झाले असून तेही मोठ्या प्रमाणावर ग्रामीण धनिकांच्याच हाती आहे. शेतकरी-शेतमजूर यांना रास्त दराने कर्ज मिळण्याची काही सोय नाही आणि सावकारी व्याजाच्या बोजाखाली ते कर्जात खोलवर बुडले आहेत. महिलांना अल्प वेतन व वेतनात मिळणारी सापत्नभावाची वागणूक, हे एक ठळक वैशिष्ट्य आहे. शेतमजुरांच्या बाबतीत एकूण रोजगाराची सरासरी वर्षाला १८० दिवसांपेक्षाही कमी आहे. ग्रामीण जनतेपैकी ५० टक्क्यांहून जास्त जनता अर्धपोटी जीवन जगत आहे. ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी आहे आणि ग्रामीण गरीब जनता पिण्यास पाणी नाही, आरोग्याच्या सुविधा नाहीत, अशा परिस्थितीत अनारोग्यदायक वातावरणात भिकार झोपड्यांत राहते.

**३.२१** बहुतेक सर्व ग्रामीण विभागांमध्ये जमीनदार-धनिक शेतकरी-कंत्राटदार-बडे व्यापारी यांची एक मजबूत साखळी उदयाला आली आहे. हे सर्व ग्रामीण धनिकांमध्ये मोडतात. पंचायत राज्य संस्था, सहकारी सोसायट्या, ग्रामीण बँका आणि पतसंस्था यांवर, डाव्यांच्या वर्चस्वाखाली असलेली राज्ये वगळली तर, या ग्रामीण धनिकांचेच वर्चस्व चालते. भांडवलदार-जमीनदारवर्गांच्या पक्षांच्या ग्रामीण नेतृत्वावर त्यांचेच नियंत्रण आहे. हे वर्ग जे वरकड मूल्य शोषून घेतात, त्याचा पुन्हा वापर सावकारी, सट्टेबाजीचे उद्योग, जमिनीचा विकास यांमध्ये, तसेच कृषिआधारित उद्योगधंदे स्थापण्यासही केला जातो. ग्रामीण विभागांत वर्चस्व असलेले हे वर्ग पाठिंबा मिळविण्यासाठी जातपात संबंधांचा वापर करतात आणि ग्रामीण गरिबांमध्ये दहशतनिर्मितीसाठी हिंसाचाराचा आधार घेतात. भारताची घटना लागू होऊन ५० वर्षे उलटल्यावरही, जमीनदारांच्या विरोधामुळे कोणत्याही सरकारने शेतमजुरांना किमान वेतनाची, सुधारित जीवनमानाची व सामाजिक सुरक्षेची हमी देणारा केंद्रीय कायदा केलेला नाही.

**३.२२** ग्रामीण अर्थव्यवस्थेचे झपाट्याने व्यापारीकरण झाल्यामुळे अन्नधान्य व शेतीउत्पादनाची बाजारपेठ यांत प्रचंड वाढ झाली आहे. मक्तेदारी स्वरूपाच्या व्यापारी संघटनांची शेती उत्पादनावरील पकड मजबूत झाली आहे. उदारीकरणामुळे



जागतिक बाजारपेठेत कार्यरत असलेल्या बहुराष्ट्रीय महामंडळांपाशी प्रगत तंत्रज्ञान असल्यामुळे त्यांना शेतीउत्पादनाच्या किंमतींवर बरेच मोठे व थेट नियंत्रण ठेवता येते. विषम स्वरूपाची देवाणघेवाण आणि किंमतींतील प्रचंड स्वरूपाचे चढउतार, यांमुळे शेतकऱ्यांच्या शोषणात प्रचंड वाढ झाली आहे आणि हे एक कायमचे वैशिष्ट्य बनले आहे. परिणामी, शेतीमालाचा विक्रेता आणि औद्योगिक उत्पादनाचा ग्राहक ह्या दोन्ही बाजूंनी शेतकरी पिळला जात आहे.

**३.२३** शासन-पुरस्कृत भांडवलदारी विकास संपुष्टात आल्यानंतर जी उदारीकरणाची धोरणे आली, त्यांमुळे शेतीविषयक व ग्रामीण विकास धोरणांना विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात एक धोकेबाज व प्रतिगामी स्वरूपाचे वळण मिळाले आहे. शेती, सिंचन व इतर पायाभूत सोयीसुविधा यांमधील सार्वजनिक भांडवल गुंतवणुकीत, तसेच सरकारी क्षेत्रातील पतपुरवठ्यामध्येही प्रचंड घट झाल्याने, त्याचा सर्वात जास्त फटका ग्रामीण गरीब कुटुंबांना बसतो. ग्रामीण रोजगार आणि दारिद्र्यनिर्मूलनाच्या योजनांत कपात केली गेली आहे. सरकारी धोरणांचा रोख निर्यात-प्रवण शेतीकडे झाल्यामुळे जमिनीचा वापर आणि पिकांच्या पद्धती यांत साम्राज्यवादी देशांच्या मागण्या भागवण्याच्या दिशेने बदल झाला आहे. अन्नधान्य उत्पादनावरील भर कमी करण्यात आल्यामुळे अन्नधान्यांच्या बाबतीत भारताच्या स्वयंपूर्णतेला, आणि पर्यायाने देशाच्या सार्वभौमत्वालाच, सरळसरळ धोका निर्माण झाला आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या राजवटीखाली शेतीउत्पादनांच्या आयातीवरील सर्व संख्यात्मक निर्बंध काढून टाकले गेले असल्यामुळे, शेतकऱ्यांच्या जीवनमानावर गंभीर परिणाम झाला आहे. कमाल जमीनधारणा कायदे शिथिल करून भारतीय बडे भांडवलदार आणि परदेशी कृषी उद्योजकांना जमिनी करारावर देण्यासाठी राज्य सरकारांवर दबाव वाढत चालला आहे. बी-बियाणे, दुग्धशाळा आणि इतर क्षेत्रांत बहुराष्ट्रीय महामंडळे शेतीउत्पादनाच्या क्षेत्रांत शिरकाव करीत आहेत. जागतिक व्यापार संघटना व बहुराष्ट्रीय महामंडळांच्या दडपणाखाली जैविक साधनसामुग्रीच्या बाबतीतील भारताच्या स्वातंत्र्यावर पाणी सोडणारी आणि शेतकऱ्यांचे व खऱ्याखुऱ्या वनस्पती-उत्पादकांचे हक्क सोडून देणारी धोरणे अवलंबिली जात आहेत. शासन-पुरस्कृत शेतीविषयक संशोधन व विस्तारपद्धतीही कमजोर केल्या जात आहेत.

**३.२४** शेतीतील शासन-पुरस्कृत भांडवलदारी विकासामुळे एकीकडे जमीनदार, भांडवली शेतकरी, धनिक शेतकरी व त्यांचे दोस्त असे ग्रामीण धनिक, तर दुसरीकडे मुख्यत: शेतमजूर, गरीब शेतकरी आणि कारागीर असा शेतकरी जनसमुदाय, यांच्यामध्ये तीव्र स्वरूपाची विभागणी झाली आहे. शेतीमध्ये नंतर आलेल्या उदारीकरणाच्या धोरणांमुळे ग्रामीण गरिबांवरील बोजांत आणखी वाढ झाली आहे. जमीन-मालकीची मक्तेदारी मोडून काढल्याशिवाय आणि गरीब शेतकरी व शेतमजूर यांच्यावरील कर्जाचे ओझे नष्ट केल्याशिवाय देशाच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाचा पाया घालणे अशक्य आहे.

**३.२५** साम्राज्यशाहीने रेटलेले जागतिकीकरण व भारतीय राज्यकर्त्यावर्गांनी अंमलात आणलेली उदारीकरणाची धोरणे, यांमुळे देशाच्या सर्व क्षेत्रांमध्ये साम्राज्यवादी शिरकाव वाढला आहे. आपली अर्थव्यवस्था बहुराष्ट्रीय महामंडळांना आणि साम्राज्यवादी वित्तीय भांडवलाला खोलून देणे, हा भारतीय समाजातील या घुसखोरीचा आणि त्याच्या सर्व क्षेत्रांवर प्रभाव पाडण्याचा पाया झाला आहे. नोकरशाही, शिक्षणपद्धती, प्रसारमाध्यमे आणि सांस्कृतिक क्षेत्रे ही साम्राज्यवादी घुसखोरीखाली आणली जात आहेत.

**३.२६** समाजसत्तावादाची पिछेहाट झाल्यामुळे जगातील शक्तींच्या समतोलात बदल झाल्याने मूलतत्त्ववादी, प्रतिगामी आणि वंश-आधारित दुरभिमानी शक्तींचा परिणाम भारतावरही झाला आहे. अशा शक्तींमध्ये झालेल्या वाढीचा फायदा घेऊन साम्राज्यशाही देशाची एकता कमजोर करू पाहत आहे, कारण त्यातूनच तिची पकड आणि प्रभाव मजबूत होऊ शकतो. शक्तिशाली आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांचा ताबा बहुराष्ट्रीय महामंडळांकडे असल्यामुळे, साम्राज्यशाहीला सामाजिक व सांस्कृतिक जीवनात थेट हस्तक्षेप करून त्यांच्यावर प्रभाव पाडणे शक्य होते. चंगळवादी, अहंमन्यतावादी व नैतिक अध:पतनकारी मूल्ये आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांमधून पसरविली जातात आणि त्यांचा सरळसरळ परिणाम आपल्या समाजावर होतो. भारतातील प्रसारमाध्यमांवर बड्या भांडवलदारांचे, तसेच इतर व्यापारी हितसंबंधांचे नियंत्रण आहे, आणि तेही पद्धतशीरपणे याच मूल्यांचा प्रसार करतात. निकोप जनवादी आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांचा विकास करण्यासाठी असल्या प्रतिगामी प्रवृत्तींचा मुकाबला करण्याची गरज आहे.



**३.२७** भारताची राज्यघटना १९५० साली स्वीकारली गेली. शासनाने अंमलात आणावयाची काही आदेशात्मक तत्त्वे तिने घालून दिली आहेत. यांमध्ये पुढील तत्त्वांचा समावेश आहे: प्रत्येक नागरिकाला पुरेशा प्रमाणावर जीवनसाधने उपलब्ध करून देणे; त्याला कामाचा हक्क देणे; संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही अशी अर्थव्यवस्था प्रस्थापित करणे; शिक्षणाचा हक्क आणि बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करणे; कामगारांना जीवन वेतन आणि पुरुष व स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन देणे. यांपैकी एकही तत्त्व प्रत्यक्षात अंमलात आणले गेलेले नाही. राज्यघटनेने घालून दिलेले आदेश आणि भांडवलदारी राज्यकर्त्यांचा व्यवहार यांच्यामधील प्रचंड दरी हे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या भांडवलदारी-जमीनदारी व्यवस्थेवरील जळजळीत आरोपपत्रच आहे.

# ४
# परराष्ट्रीय धोरण

**४.१** कोणत्याही देशाचे आणि त्याच्या सरकारचे परराष्ट्रीय धोरण हे अंतिमदृष्ट्या त्याच्या देशांतर्गत धोरणाचेच प्रक्षेपण असते आणि त्या त्या देशाच्या व सरकारच्या शिरोभागी असलेल्या वर्गाचे अगर वर्गांचे हितसंबंधच त्या धोरणात मुख्यत: व्यक्त होत असतात. भारत सरकारच्या परराष्ट्रीय धोरणात स्वाभाविकच आपल्या भांडवलदारवर्गाच्या दुहेरी स्वरूपाचे प्रतिबिंब आहे. हे दुहेरी स्वरूप म्हणजे एकीकडे साम्राज्यशाहीला विरोध, तर दुसरीकडे तिच्याशी तडजोड व सहकार्य करण्याचे स्वरूप होय. गेल्या पाच दशकांतील आपल्या परराष्ट्रीय धोरणाच्या उत्क्रांतीचा आढावा घेतल्यास त्यातून हे दुहेरी स्वरूप स्पष्ट होते. सुरुवातीस पन्नाशीच्या दशकाच्या मध्यापर्यंतच्या काळात भारत सरकारने ब्रिटनची आणि इतर साम्राज्यवादी सत्तांची तुष्टी करण्याचे मिळमिळीत धोरण अवलंबिले होते. परंतु पन्नाशीच्या दशकाच्या मध्यापासून त्यात एका नवीन दिशेची सुरुवात झाली. साम्राज्यवादी युतीशी हातमिळवणी करण्यापासून अलग राहण्याच्या शक्यता निर्माण झाल्या. देशाच्या परराष्ट्रीय धोरणात अलिप्ततावादाच्या दिशेने, लष्करी गटांच्या विरोधी, शांततेसाठी आणि वासाहतिक जनतेच्या राष्ट्रीय मुक्ती संग्रामांना पाठिंबा देणारे असे बदल झाले.

**४.२** ह्या धोरणाच्या परिणामी, सोव्हिएत युनियन व समाजसत्तावादी देश यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले. परंतु १९६२ साली चीनबरोबर झालेल्या सीमा संघर्षामुळे अमेरिकेशी व पाश्चात्य देशांशी सहकार्य करण्याची अवस्था निर्माण झाली. भारताने त्यांच्याकडून लष्करी मदत मागितली. या कालखंडानंतर आपल्या परराष्ट्रीय धोरणाने पुन्हा एकदा साम्राज्यशाहीविरोधी दिशेचा स्वीकार केला. १९७१ साली बांगलादेशच्या मुक्ती संग्रामाला दिलेला पाठिंबा आणि सोव्हिएत युनियनशी झालेला मैत्रीचा करार, यांमधून एक नवा टप्पा निर्माण झाला. सत्तरीच्या दशकात राष्ट्रीय मुक्ती संग्रामांना आणि जागतिक शांततेला पाठिंबा देऊन भारताने आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये सक्रिय भूमिका बजावली.

**४.३** काश्मीरचा प्रश्न आणि पाकिस्तानचा वापर आपला तळ म्हणून करण्याचे अमेरिकेचे दूरगामी उद्दिष्ट, यामधून परराष्ट्रीय धोरणाच्या संदर्भात भारतीय भांडवलदारवर्ग व साम्राज्यशाही यांच्यामधील अंतर्विरोध व्यक्त झाले. नवस्वतंत्र राष्ट्रांमधील एक नेतृत्वदायी देश म्हणून भारतीय भांडवलदारवर्गाने अलिप्ततावादी धोरणाची सुरुवात केली होती. बहुतांशी, या धोरणाचा देशाच्या हितसंबंधांना चांगला फायदा झाला. परंतु राज्यकर्त्यावर्गाचे वर्गीय स्वरूप लक्षात घेता, या धोरणामध्येही हेलकावे होतेच. परदेशी भांडवलाला झुकते माप देणारी देशांतर्गत धोरणे आणि स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण यांच्यामधील अंतर्विरोध सतत अस्तित्वात होते.

**४.४** सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्यानंतर आणि देशांतर्गत उदारीकरणाची आर्थिक धोरणे स्वीकारल्यानंतर, विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात भारताच्या परराष्ट्रीय धोरणाने एका नव्या टप्प्यात प्रवेश केला. प्रदीर्घ काळपर्यंत राखलेले अलिप्ततावादी धोरण आणि साम्राज्यशाहीविरोधी परराष्ट्रीय धोरण उलटविण्याची प्रक्रिया नरसिंहराव सरकारच्या काळात सुरू झाली. आत्मनिर्भरतेकडे पाठ फिरवणे आणि परकीय भांडवल व उदारीकरण यांचा अवलंब करणे, यामुळे साम्राज्यशाहीला भारतावर आणखी दडपण आणण्यास मदत झाली आणि त्याचे प्रतिबिंब भारताच्या अनेक परराष्ट्रीय धोरणविषयक भूमिकांमधून दिसून आले. नव्वदीच्या दशकात भारत सरकारने अमेरिकेबरोबर लष्करी प्रशिक्षण आणि संयुक्त कवायतींसाठी लष्करी सहकार्याचा करार केला. १९९८ साली भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आल्यानंतर ही साम्राज्यवादधार्जिणी



प्रवृत्ती जास्तच मजबूत झाली आहे. अमेरिकेचा कनिष्ठ भागीदार होण्याच्या धोरणाचा पुरस्कार करून भाजप राजवटीने एक महत्त्वाचा बदल घडवून आणला आहे. त्याने अमेरिकेची जागतिक उद्दिष्टे सामावून घेण्यासाठी, देशाने प्रदीर्घ काळपर्यंत स्वीकारलेल्या व्यूहरचनात्मक युतीमध्ये भारताला ओढण्याचे अमेरिकेचे दीर्घ पल्ल्याचे नियोजन असल्याने, आपल्या परराष्ट्रीय धोरणाला असलेला धोका खरा आहे. अलिप्ततावाद आणि साम्राज्यशाहीविरोध यांवर आधारित सातत्यपूर्ण परराष्ट्रीय धोरण हे भारताच्या खऱ्याखुऱ्या हितसंबंधांचे रक्षण करणारे असले, तरी बडा भांडवलदारवर्ग शासनाचे नेतृत्व करीत असताना आणि साम्राज्यवादधार्जिण्या आर्थिक धोरणांचा अवलंब करीत असताना, त्याची हमी देता येणे शक्य नाही.

**४.५** मे १९९८च्या पोखरणच्या आण्विक चाचण्यांनंतर भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने जो आण्विक शस्त्रास्त्रनिर्मितीचा निर्णय घेतला, तो भारताच्या परराष्ट्रीय आणि आण्विक धोरणामधील एक धोकेबाज नवा टप्पा आहे. या उपखंडात आण्विक शस्त्रास्त्र स्पर्धा सुरू होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, कारण पाकिस्तानने भारताच्या आण्विक चाचण्यांना प्रतिसाद दिला आहे. प्रदीर्घ काळापासून चालत आलेल्या भारताच्या अलिप्ततावाद व शांततेच्या धोरणांना युद्धखोर आण्विक धोरणामुळे सुरुंग लागला आहे. त्याने भारताला अमेरिकेच्या नेतृत्वाखालील साम्राज्यवादी दबावासमोर जास्त कमजोर बनवले आहे.

**४.६** भारताच्या परराष्ट्रीय धोरणामधील ही साम्राज्यवादधार्जिणी दिशा बदलण्यासाठी, तसेच आपल्या परराष्ट्रीय धोरणाचा पाया पुनः अलिप्ततावादाचा व दिशा साम्राज्यवादी दबाव झिडकारून टाकण्याची असेल यासाठी, डाव्या आणि जनवादी शक्तींना आगामी काळात महत्त्वाचा संघर्ष करावा लागेल. केवळ अशा धोरणातूनच भारताला जागतिक घडामोडींमधील स्वतंत्र भूमिका टिकवून धरता येईल आणि आपल्या आर्थिक स्वातंत्र्याचे रक्षण करता येईल.

## ५
## राज्यरचना आणि लोकशाही

**५.१** आजची भारतीय शासनसंस्था म्हणजे भांडवलदारी विकासमार्ग चोखाळताना परदेशी वित्त-भांडवलाशी वाढते सहकार्य करीत असणाऱ्या

बड्या भांडवलदारांच्या नेतृत्वाखाली भांडवलदारांच्या आणि जमीनदारांच्या वर्गीय सत्तेचे साधन आहे. राष्ट्रजीवनातील शासनसंस्थेची भूमिका आणि तिची कार्ये मुख्यत: ह्या वर्गस्वरूपानेच निश्चित होतात.

**५.२** राज्यरचना जरी नाममात्र संघराज्य पद्धतीची असली, तरी त्यातील बहुतेक सत्ता आणि साधनसामुग्री ही केंद्र सरकारच्या हाती एकवटलेली आहे. बड्या भांडवलदारवर्गाने सुरुवातीला जरी समान भाषेच्या पायावर राज्ये बनविण्याच्या मागणीला प्रतिरोध केला होता, तरी जनआंदोलनांच्या तीव्र दबावाखाली त्यांना अखेर भाषिक राज्यांच्या स्थापनेला मान्यता देणे भाग पडले. भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने प्रशासकीय सोयीच्या नावाने छोट्या राज्यांचा पुरस्कार करून, भाषिक राज्यांच्या तत्त्वावर नव्याने हला चढविला आहे. यामुळे संघराज्य रचना जास्त कमजोर होईल. जनतेने निवडून दिलेली सरकारे बरखास्त करण्यासाठी, आणि निवडून दिलेल्या राज्य विधानसभा विसर्जित करण्यासाठी, केंद्राने घटनेच्या कलम ३५६ मधील अंगभूत लोकशाहीविरोधी तरतूदींचा वापर केला. हा वापर म्हणजे संघराज्य पद्धती उलथून पाडण्याचे आणि राज्यांच्या स्वायत्ततेवर हल्ले करण्याचे एक मोठे साधन आहे. राज्यांना फारच कमी सत्ता असल्याने, त्यांना केंद्र सरकारवर अवलंबून राहावे लागते व त्यामुळे त्यांच्या विकासावर बंधने पडतात.

**५.३** साहजिकच, अशा स्थितीत केंद्र सरकार आणि राज्ये यांमधले अंतर्विरोध वाढत गेले आहेत. पुष्कळ वेळा अशा अंतर्विरोधांच्या मुळाशी एकीकडे बडे भांडवलदार आणि दुसरीकडे या ना त्या राज्यामधली भांडवलदार-जमीनदारांसहित बहुसंख्य जनता या दोहोंतला अधिक खोलवर गेलेला अंतर्विरोध असतो. भांडवलशाहीखाली आर्थिक विकासाची विषमता वाढतच असल्यामुळे हा अंतर्विरोध सतत जास्त तीव्र होत जातो. याचे एक राजकीय निदर्शक म्हणजे ह्या राज्यांतील जनतेच्या भाषिक व राष्ट्रीय भावना प्रतिबिंबित करणाऱ्या प्रादेशिक राजकीय पक्षांचा उदय; हे पक्ष बहुधा त्या प्रदेशांतील भांडवलदार-जमीनदारवर्गाचे प्रतिनिधित्व करतात.

**५.४** स्वातंत्र्योत्तर काळात भांडवलदार-जमीनदारवर्गाने जी धोरणे अवलंबिली, त्यामुळे राष्ट्रीय एकतेचे प्रश्न चिघळले आहेत. भारताच्या ईशान्य भागात मोठ्या प्रमाणावर अल्पसंख्य राष्ट्रगट व वांशिक गट राहतात. भांडवली



मार्गामुळे होणारा विषम विकास आणि प्रादेशिक असमतोल यांमुळे त्यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागला आहे. यातून अतिरेकी शक्तींची वाढ होण्यास सुपीक जमीन पुरविली गेली आहे. या शक्ती फुटीरतावादाचा पुरस्कार करतात व साम्राज्यवादी संस्था त्यांचा वापर करतात. या अतिरेक्यांच्या हिंसक कारवाया आणि वांशिक संघर्ष यांमुळे विकासकार्य आणि जनवादी उपक्रम यांमध्ये अडथळा निर्माण होतो.

**५.५** जम्मू आणि काश्मीरला घटनेच्या ३७०व्या कलमाखाली खास दर्जा आणि स्वायत्तता बहाल केली गेली होती. जसजशी दशके उलटली, तसतशी या स्वायत्ततेला फार मोठ्या प्रमाणावर कात्री लावण्यात आली आणि काश्मीर खोऱ्यातील जनतेचा दुरावा वाढला. पाकिस्तानचा पाठिंबा लाभलेल्या फुटीरतावादी शक्तींनी त्याचा वापर करून घेतला. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील साम्राज्यशाही या संघर्षाचा फायदा भारतावर दबाव आणण्यासाठी आणि या प्रदेशातील आपला हस्तक्षेप वाढवण्यासाठी करून घेते. ईशान्य भारत तसेच काश्मीरच्या प्रश्नांमधून भांडवलदार-जमीनदारवर्गांना राष्ट्रीय एकतेचे अतिमहत्त्वाचे प्रश्न जनवादी पद्धतीने हाताळण्यात आलेले अपयश स्पष्टपणे दिसून येते.

**५.६** भारतात आदिवासी जनतेची लोकसंख्या ७ कोटी आहे. रानटी भांडवलदारी व निम-सरंजामदारी शोषणाचे ते बळी ठरले आहेत. त्यांच्या जमिनी त्यांच्यापासून हिरावून घेतल्या गेल्या आहेत. जंगलांवरील त्यांचा हक्क त्यांना दिला जात नाही व त्यांचा वापर केवळ कंत्राटदार व जमीनदार यांच्यासाठीचे स्वस्त वेठबिगार म्हणून केला जातो. काही राज्यांमध्ये आदिवासी जनता सलग भूभागांत राहते आणि तिच्या स्वत:च्या विशिष्ट भाषा व संस्कृती आहेत. या आदिवासी जनतेमध्ये आता विकासासाठी आपल्या हक्क-रक्षणाची, तसेच आपली अस्मिता व संस्कृती यांचे रक्षण करण्याची, नवीन जाणीव निर्माण झाली आहे. त्यांच्या अस्मितेला, किंबहुना त्यांच्या अस्तित्वालाच, असलेले संकट आणि भांडवलदार-जमीनदार राज्यकर्त्यांची भावनाशून्य धोरणे, यांमुळे या आदिवासी जनतेच्या काही विभागांमध्ये फुटीरतावादी प्रवृत्ती वाढीस लागल्या आहेत. ज्या सलग भूभागांमध्ये ते बहुसंख्येने आहेत, तेथे त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी प्रादेशिक स्वायत्तता ही एक जनवादी व न्याय्य मागणी आहे. भांडवलदार-जमीनदार-कंत्राटदार युती ही नेहमीच त्यांच्या नेत्यांना काही सवलती देऊन त्यांच्या परंपरागत ऐक्यात फूट पाडू

पाहते, त्यांचे न्याय्य हक्क नाकारते आणि रानटी ताकदीचा वापर करून त्यांना दडपते.

**५.७** भारताच्या घटनेमध्ये धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व कोरले गेले आहे व शासनाचे बडे भांडवलदारी नेतृत्व धर्मनिरपेक्ष लोकशाहीच्या मूल्यांची घोषणा करीत असते. परंतु भांडवलदारवर्गाकडून धर्मनिरपेक्षतेचा होणारा व्यवहार हा सदोष आहे. ते धर्मनिरपेक्षतेच्या एकूण संकल्पनेचाच विपर्यास करू पाहतात. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्म आणि राजकारण यांची एकमेकांपासून पूर्ण फारकत करणे होय; पण हे पुढारी त्याऐवजी लोकांची अशी समजूत करून देऊ इच्छितात की धर्मनिरपेक्षता म्हणजे शासनाच्या व्यवहारात आणि राजकीय जीवनात ढवळाढवळ करण्याचे सर्व धर्मांना समान स्वातंत्र्य देणे होय. धर्मनिरपेक्षताविरोधी प्रवृत्तींचा खंबीरपणे मुकाबला करण्याऐवजी, बऱ्याच वेळा भांडवलदारवर्ग त्यांना सवलती देतो व सुदृढ करतो. धर्मांध व फॅसिस्ट रा.स्व.संघ-प्रणीत युतीचा उदय झाल्यापासून आणि तिने केंद्रात सत्ता हाती घेतल्यापासून देशाच्या धर्मनिरपेक्ष पायाला अत्यंत गंभीर धोका निर्माण झाला आहे. शासन, प्रशासन, शिक्षणसंस्था आणि प्रसारमाध्यमे या संस्थांचे धर्मांधकरण करण्याचे पद्धतशीर प्रयत्न चालू आहेत. बहुसंख्यांकांच्या धर्मांधतेत झालेल्या वाढीमुळे अल्पसंख्यांकांच्या धर्मांधतेला बळ लाभेल आणि राष्ट्रीय एकता धोक्यात येईल. बड्या भांडवलदारवर्गाच्या काही विभागांनी भाजप आणि त्याचा धर्मांध मंच यांना जो पाठिंबा दिला आहे, त्यातून देशातील लोकशाहीला आणि धर्मनिरपेक्षतेला गंभीर धोके संभवतात.

**५.८** म्हणूनच, धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी विनातडजोड लढा करण्यास आपला पक्ष बांधील आहे. ह्या तत्वापासून यत्किंचितही च्युती होताना आढळल्यास ही गोष्ट चव्हाट्यावर आणून त्याविरुद्ध झगडले पाहिजे. बहुसंख्य धार्मिक जमात असो, अल्पसंख्य धार्मिक जमाती असोत, किंवा कोणताच धर्म न मानणारे लोक असोत, त्यांना हवा तो धर्म मानण्याचा वा न मानण्याचा व त्याप्रमाणे व्यवहार करण्याचा अधिकार आहे व ह्या अधिकाराचे आपण रक्षण केले पाहिजे; मात्र ते करीत असताना, देशाच्या आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय जीवनात धर्माचे कोणत्याही प्रकारे अतिक्रमण होणार नाही, यासाठी देखील पक्षाने लढले पाहिजे, आणि संस्कृती, शिक्षण व समाज यामध्ये धर्मनिरपेक्ष आणि जनवादी



मूल्ये उचलून धरली पाहिजेत. धार्मिक जातीयवादावर आधारित फॅसिस्ट प्रवृत्तींच्या वाढत्या धोक्याला सर्व पातळ्यांवर खंबीर विरोध केला पाहिजे.

**५.९** भांडवलदारी शोषणव्यवस्थेमध्ये घटनेने अल्पसंख्यांकांना हमीपूर्वक दिलेल्या अधिकारांची देखील अंमलबजावणी होत नाही. आर्थिक आणि सामाजिक, दोन्ही क्षेत्रांत मुस्लिम अल्पसंख्यांकांना द्यावयाच्या समान संधींचा अभाव आहे आणि त्यांच्याविरुद्ध सापत्नभाव दाखविला जातो. जातीय दंगली आणि मुस्लिमांविरुद्ध हिंसाचारी हल्ले हे कायमचे वैशिष्ट्य बनले आहे. रा.स्व. संघ व त्याच्या संलग्न संस्था सतत अल्पसंख्यांकांविरुद्ध द्वेषाला चिथावणी देतात आणि ख्रिश्चन जमातीला देखील त्यांनी आपले लक्ष्य केले आहे. यातून अल्पसंख्यांकांमध्ये दुरावा व असुरक्षितता पोसली जाते. त्यातून मूलतत्त्ववादी प्रवृत्ती निर्माण होतात आणि धर्मनिरपेक्षतेचा पाया कमजोर होतो. अल्पसंख्यांक जातीयवादामुळे स्वत: अल्पसंख्यांकच अलग पडतात आणि सर्व दडपलेल्या विभागांच्या समान आंदोलनाला अडथळा निर्माण होतो. अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे रक्षण हा लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता बलशाली करण्याच्या लढ्याचा एक निर्णायक पैलू आहे.

**५.१०** भांडवलदार-जमीनदारवर्गीय व्यवस्थेला जातपातींचा जुलुम नष्ट करण्यातही अपयश आले आहे. याबाबतीत सर्वात वाईट अनुभव अनुसूचित जातींना येतो. अस्पृश्यता व इतर प्रकारचे भेदभाव हे जरी बेकायदेशीर असल्याचे घोषित केले गेले असले, तरी दलितांना त्यांना तोंड द्यावे लागतेच. दलितांमध्ये मुक्तीची जी वाढती जाणीव निर्माण होत आहे, तिचा मुकाबला रानटी जुलुम आणि अत्याचार यांनी करण्याचा प्रयत्न केला जातो. दलितांच्या आग्रही भूमिकेला एक जनवादी गाभा आहे व त्यातून समाजातील या सर्वात दडपलेल्या जनविभागाच्या आशाआकांक्षा प्रतिबिंबित होतात. इतर मागास जातींनी देखील आपल्या जातपातग्रस्त समाजामध्ये त्यांच्या हक्कांचा आग्रह धरला आहे.

**५.११** त्याबरोबरच मतपेट्या सुदृढ करण्याच्या संकुचित उद्देशाने जातींची विभागणी कायम राखण्यासाठी आणि ह्या दडपल्या गेलेल्या जनविभागांना समान जनवादी चळवळीपासून अलग ठेवण्यासाठी केलेले निर्भेळ जातपातवादी अपील देखील त्यात कार्यरत असते. अनेक जातपातींचे नेते आणि भांडवलदारी

राजकीय पक्षांचे काही नेते हे आपल्या संकुचित निवडणूक फायद्यासाठी जातींच्या ध्रुवीकरणाचा वापर करू पाहतात, आणि सर्व जातीपातींच्या जुलुमग्रस्त जनविभागांचे एकजुटीचे आंदोलन उभे करण्याला त्यांचा तीव्र विरोध असतो. जमीन, वेतन आणि जमीनदारशाहीविरोधी लढा हा जो आज जुनी समाजव्यवस्था उलथून टाकण्याचा पाया आहे, त्याच मूलभूत वर्गीय प्रश्नांकडे ते दुर्लक्ष करतात.

**५.१२** जातपातवादी जुलुम आणि भेदभाव या प्रश्नाला प्रदीर्घ इतिहास आहे आणि त्याची पाळेमुळे भांडवलशाहीपूर्व समाजव्यवस्थेमध्ये खोलवर गेली आहेत. भांडवलदारी विकासाखालील समाजाने या प्रचलित जातिव्यवस्थेशी तडजोड केली आहे. खुद्द भारतीय भांडवलदारवर्गच जातपातवादी पूर्वग्रहांना खतपाणी घालतो. कामगारवर्गीय ऐक्याला जातिव्यवस्थेविरुद्ध आणि दलितांवरील जुलमाविरुद्ध एकजूट अभिप्रेत आहे, कारण दलित जनतेचा प्रचंड बहुसंख्य विभाग हा श्रमिक वर्गाचाच एक भाग आहे. सामाजिक सुधारणांच्या चळवळीच्या मार्गे जातिव्यवस्थेच्या निर्मूलनाचा लढा आणि सामाजिक जुलुमाच्या सर्व प्रकारांविरुद्धचा लढा हा जनवादी क्रांतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. जातपातवादी जुलुमांविरुद्धचा लढा हा वर्गीय शोषणाविरुद्धच्या लढ्याशी जोडला गेलेला आहे.

**५.१३** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय महिलांना - ज्यांचा स्वातंत्र्यलढ्यात समान सहभाग होता – शतकानुशतकांच्या जुन्या सरंजामदारी व लिंगभेदावर आधारित जुलुम-जबरदस्तीच्या शृंखलांपासून मुक्ती मिळण्याची आशा होती. परंतु त्या बाबतीत प्रगती होण्याचे तर दूरच राहिले, भांडवलदार-जमीनदार राजवटीच्या पाच दशकांनी प्रत्येक क्षेत्रात पुरुषवर्चस्वच कायम केले आहे. महिला म्हणून, कामकरी म्हणून आणि नागरिक म्हणून महिलांचे वेगवेगळ्या पातळ्यांवर शोषण केले जाते. उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे सामाजिक आणि आर्थिक अशा दोन्ही क्षेत्रांत लिंगभेद-आधारित शोषणाचे नवनवे प्रकार अस्तित्वात आले आहेत. परिणामी, महिलांविरुद्ध हिंसाचार वाढला आहे. महिलांचा विकास होण्याकरिता आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक व राजकीय जीवनामध्ये स्वतंत्र भूमिका ह्या मूलभूत अटी आहेत. महिलांच्या विषम दर्जाला प्रतिरोध आणि समानतेसाठी चाललेली महिला चळवळ, हा सामाजिक मुक्ती आंदोलनाचा एक अतिमहत्त्वाचा भाग आहे.



**५.१४** पन्नास वर्षांच्या भांडवलदार-जमीनदार राजवटीमुळे शासकीय सत्तेच्या सर्व संस्थांना कीड लागली आहे. भांडवली विकासाची वाढ प्रतिबिंबित करणारी प्रशासनयंत्रणा अत्यंत केंद्रीभूत अशा नोकरशाहीवर उभी आहे; ह्या यंत्रणेत सत्ता अगदी वरच्या थरांत एकवटलेली असून, जनतेपासून अलग असणारे व शोषकवर्गांच्या हितसंबंधांसाठी इमानेइतबारे झटणारे खास हक्कदार नोकरशहा ह्या सत्तेचे संचालन करीत असतात. नोकरशाहीमध्ये झालेली अतिप्रचंड वाढ, राज्यकर्त्यावर्गांबरोबर असलेले तिचे मजबूत दुवे आणि तींत बोकाळलेला कमालीचा भ्रष्टाचार हे समाजाचा लोकशाही ढाचा कमजोर करणारे घटक आहेत.

**५.१५** न्यायदान यंत्रणा ही कामगार-शेतकरी आणि श्रमिक जनतेच्या इतर विभागांविरुद्ध झुकलेली आहे. औपचारिकदृष्ट्या, तत्त्व म्हणून धनिक व गरीब हे जरी समान असले, तरी मूलतः न्यायदानाची पद्धत ही शोषकवर्गांच्या हितसंबंधांचे रक्षण करते व त्यांची वर्गीय सत्ता उचलून धरते. न्यायदान यंत्रणा शासनाच्या कार्यकारी यंत्रणेपासून वेगळी असावी, हे भांडवली लोकशाहीचे तत्त्वदेखील पूर्णपणे अंमलात आणले जात नाही आणि न्यायदानावर कार्यकारी शासनाचा प्रभाव व नियंत्रण राहते. घटनेने बहाल केलेली लोकशाही तत्त्वे आणि मूलभूत अधिकार उचलून धरणारे न्यायनिवाडे राज्यकर्तेवर्ग उलथून पाडतात. न्यायमूर्तींचे उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रभावी यंत्रणेच्या अभावामुळे न्यायदान यंत्रणेच्या काही विभागांमध्ये भ्रष्टाचारी व्यवहार चालत असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे न्यायदान यंत्रणेवरील जनतेच्या विश्वासाला तडा जातो.

**५.१६** स्वतंत्र भारतातील सशस्त्र दलांच्या संरचनेत अजूनही वासाहतिक वारशाचे अवशेष सापडतात. देशाच्या सरहद्दीचे रक्षण करणे ही त्यांच्याकडून अपेक्षा असते. पण स्वतःचे वर्गीय हितसंबंध आणि शोषित जनसमूहांचे हितसंबंध यांच्यामध्ये जेव्हा उघड उघड संघर्ष निर्माण होतो, तेव्हा राज्यकर्तेवर्ग लष्करी व निम-लष्करी दले यांच्यावर जास्त जास्त विसंबून राहण्याची प्रवृत्ती दर्शवितात. सेनादलांतील जवान हे शेतकरीवर्गातून आणि श्रमिक जनतेमधून आलेले असतात व त्यांना मेहनतीची कामे करावी लागतात. राज्यकर्तेवर्ग सेनादलांतील सामान्य जवानांना जनतेपासून अलिप्त व लोकशाही हक्कांपासून वंचित ठेवतात. पोलीस दलांचा वापर जनआंदोलने दडपण्याचे एक साधन

म्हणून केला जातो. पोलीस दले राजकीय चलाखी व भ्रष्टाचार यांचे भक्ष्य बनली आहेत आणि अनेक ठिकाणी गरिबांविरुद्धच्या शोषणयंत्रणेचा ती भाग बनली आहेत.

**५.१७** कामगार, शेतकरी आणि मध्यमवर्ग यांच्याशी तुलना करता, एकूण देशात भांडवलदार व त्यांचे जमीनदार दोस्त हे अत्यंत कमी संख्येतच आहेत. तरी पण जमीन, भांडवल आणि उत्पादनाची साधने यांच्या मालकीच्या जोरावर ते बहुसंख्य श्रमिकांवर राज्य करतात आणि त्यांची पिळवणूक करतात. भांडवलदारी राजसत्ता आणि तिची सरकारे – मग ती सरकारे संसदीय लोकशाही पद्धतीनुसार बहुमताने निवडून दिलेली का असेनात – राजकीय व आर्थिक सारसर्वस्वाच्या दृष्टीने मूठभरांची सत्ताच व्यक्त करीत असतात.

**५.१८** प्रौढ मताधिकाराच्या आधारे निवडण्यात येणाऱ्या लोकसभेची तरतूद भारतीय प्रजासत्ताकाच्या राज्यघटनेत केली आहे आणि त्यात लोकांना काही मूलभूत अधिकारही दिलेले आहेत. परंतु शासनकर्ते यांपैकी बऱ्याच अधिकारांचा चुकीचा अर्थ लावतात, त्यांचा विपर्यास करतात, एवढेच नव्हे, तर त्यांचा भंगही करतात. कामगार-शेतकऱ्यांच्या आणि लोकशाही जनसमुदायांच्या लढ्यांचा प्रश्न आला, म्हणजे हे अधिकार त्यांना जवळ जवळ लागूच होत नाहीत. प्रतिबंधात्मक आदेश लागू करून लाखो लोकवस्तीच्या प्रदेशांत महिनोन् महिने अन् वर्षानुवर्षे सभास्वातंत्र्य नाकारण्यात येते. विशेषत:, जेव्हा कामगार, शेतकरी व इतर लोकशाही जनता आपल्या राजकीय व आर्थिक हक्कांसाठी आणि मागण्यांसाठी प्रत्यक्ष लढ्यांत उतरते, तेव्हा तर सरकारी दले अधिकच निर्दयपणे हिंसेचा वापर करतात. खटला न भरताच स्थानबद्धतेची तरतूद, यांसारखे अतिराक्षसी कायदे सर्रास झाले आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्रीय आणीबाणीची घटनेत जी तरतूद केली आहे, तिचा गैरवापर होतो आणि लोकशाही लढे चिरडण्यासाठी वटहुकूम काढले जातात. १९७५ साली घोषित केलेली अंतर्गत आणीबाणी हा लोकशाहीला निर्माण झालेला सर्वात गंभीर धोका होता.

**५.१९** जनवादी आंदोलनाच्या दबावाखाली सरकारला पंचायती व स्थानिक संस्थांकडे प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यासाठी कायदे



करणे भाग पडले. पश्चिम बंगाल, केरळ व त्रिपुरा या राज्यांतील डाव्या आघाडीच्या नेतृत्वाखालील सरकारांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी व त्रिस्तरीय पंचायती पद्धतीपर्यंत सत्ता पोचविण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली. परंतु डाव्यांच्या नेतृत्वाखालील राज्ये वगळता, पंचायती राज्य संस्थांचा उपयोग लोकशाही विकसित करण्यासाठी न करता, तो ग्रामीण विभागांतील जमीनदार, सावकार व कंत्राटदार यांची सत्ता कायम करण्यासाठी केला जात असतो.

**५.२०** अनेक दशकांच्या भांडवलदार-जमीनदारवर्गांच्या राजवटीच्या परिणामी भारतीय जनतेचा सांस्कृतिक विकास खुरटला आहे. परंपरा आणि धर्म यांच्या नावाखाली घातक चालीरिती आणि मूल्ये कायम ठेवली जात असून, त्यामुळे महिला आणि शोषित जातींची अवनती होत आहे. आपल्या सांस्कृतिक वारशामध्ये जे पुरोगामी व निरोगी आहे, त्याचे अवमूल्यन धर्मांध विचारसरणी करू पाहत आहे. भांडवली संस्कृती जीर्णमतवादी व जातपातवादी मूल्यांपैकी बरेच काही टिकवू पाहते. जनतेच्या सांस्कृतिक भल्यासाठी तरतूद करण्याचे तर सोडाच, पण शासनयंत्रणा अगदी साक्षरतेबाबतही भावनाशून्य हेळसांड करते. मुद्रणस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य आणि प्रचारस्वातंत्र्य यांचा पुरेपूर उपयोग शोषकवर्ग करतात, कारण वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे, रेडिओ व दूरचित्रवाणीचे जाळे यांच्यावर त्यांचे वर्चस्व असते. श्रमिक जनतेला त्यांच्या ह्या अफाट साधनसंपत्तीशी स्पर्धा करणे शक्य नसते, आणि म्हणून औपचारिकपणे सर्वांनाच बहाल असलेल्या ह्या अधिकारांचा वापर करण्यास ती असमर्थ ठरते.

**५.२१** देशातील काळ्या पैशात अतिप्रचंड वाढ आणि भ्रष्टाचाराचा अभूतपूर्व बुजबुजाट, या पार्श्वभूमीवर भांडवलदार-जमीनदार शासनयंत्रणेची अधोगती झाली आहे. उदारीकरणाच्या प्रक्रियेने अत्युच्च पातळ्यांवरील प्रचंड भ्रष्टाचारात आणखी वाढ केली आहे. सार्वजनिक स्थानांवरील अधिकारी, वरिष्ठ नोकरशहा आणि भांडवली राजकारणी हे सर्व एका भ्रष्टाचारी साखळीचे घटक असून, ती साखळी कायदा उलथून पाडते व सार्वजनिक पैशाची लूट सुलभ करते. यामुळे लोकशाहीची आणि नागरिकांच्या हक्कांची चेष्टाच होते. निवडणुकीमध्ये होणाऱ्या पैशाच्या वापरातील प्रचंड वाढ, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, निवडणुकीतील झोंडशाही व मतदान केंद्रे काबीज करण्याचे

प्रकार, या सर्वांमुळे संसदीय लोकशाही पद्धतीला गंभीर धोका निर्माण होतो.

**५.२२** तरीदेखील लोकशाहीकरता आणि स्वत:च्या हितसंबंधांच्या रक्षणाकरता लढताना, सार्वत्रिक मताधिकार, संसद व राज्य विधिमंडळे यांचा जनतेच्या हातात हत्यारे म्हणून उपयोग होऊ शकतो. जेव्हा संसदीय लोकशाहीवर अंतर्गत आणीबाणीसारखे हल्ले झाले, तेव्हा जनतेने अशा एकाधिकारशाही उपाययोजनांना विरोध केला आहे. भारतातील सध्याची संसदीय पद्धती हा भांडवलदारवर्गाच्या वर्गीय सत्तेचाच एक प्रकार असला, तरी त्यात जनतेच्या दृष्टीने एक पाऊल पुढे पडलेले आहे. आपले हितसंबंध पुढे रेटण्याची, राज्याच्या कारभारात काही प्रमाणात हस्तक्षेप करण्याची, आणि लोकशाही व सामाजिक प्रगती यांसाठी चाललेला लढा पुढे नेण्याची काही संधी जनतेला या पद्धतीत मिळते.

**५.२३** संसदीय पद्धतीला आणि लोकशाहीला जो धोका संभवतो तो जनतेपासून नव्हे किंवा तिच्या हितांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षांपासून नव्हे. तो धोका शोषकवर्गांपासून आहे. हे वर्ग आपल्या संकुचित हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी संसदीय पद्धतीचा वापर करीत असतानाच, तिला आतून व बाहेरून सुरुंग लावीत असतात. जेव्हा जनता आपली चळवळ पुढे नेण्यासाठी संसदीय संस्थांचा उपयोग करू लागते आणि बड्या भांडवलदार-जमीनदारांच्या कचाट्यातून निसटून जाऊ लागते, तेव्हा हे वर्ग संसदीय लोकशाही पायदळी तुडवण्यास मागेपुढे पाहत नाहीत. जनतेने निवडून दिलेली राज्य सरकारे केंद्र सरकार जेव्हा अनेकदा बरखास्त करते, तेव्हा त्याचा प्रत्यय येतो. पश्चिम बंगाल आणि त्रिपुरातील निमफॅसिस्ट दहशतशाही आणि त्या राज्यांतील सर्व घटनात्मक तरतुदींचा नंग्या स्वरूपाचा भंग, यांतून राज्यकर्तेवर्ग कोणत्या अधम थराला जाऊ शकतात याची ढळढळीत उदाहरणे मिळतात. अध्यक्षीय पद्धतीचे शासन अस्तित्वात आणण्याच्या व संसदीय लोकशाहीला कात्री लावण्याच्या गोष्टी ही एकाधिकारशाहीची चिन्हे आहेत, आणि उदारीकरण व आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवल यांच्या दबावाखाली ती वाढली आहेत. अशा धोक्यांपासून जनतेच्या हितार्थ संसदीय व लोकशाही संस्थांचे संरक्षण करणे आणि संसदबाह्य कार्याला जोडून अशा संस्थांचा कौशल्याने उपयोग करून घेणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.



## ६
# जनतेची लोकशाही आणि तिचा कार्यक्रम

**६.१** सध्याच्या भांडवलदार-जमीनदार राजवटीखाली जनतेचे मागासलेपण, दारिद्र्य, उपासमार, बेरोजगारी आणि शोषण यांच्यापासून मुक्ती मिळण्याची कसलीही आशा नाही, हे अनुभवाने दाखवून दिले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपासून बडा भांडवलदारवर्ग सातत्याने राजसत्तेवर राहिला आहे आणि त्या सत्तेचा वापर तो एका बाजूस बहुसंख्य जनतेच्या जीवावर आपले वर्गीय स्थान बळकट करण्यासाठी आणि दुसऱ्या बाजूस साम्राज्यशाही व जमीनदारशाही यांच्याशी तडजोड व सौदेबाजी करण्यासाठी करीत राहिला आहे. प्रगत भांडवलदारी देशांत भांडवलशाही वाढली, ती उगवत्या भांडवलदारवर्गाने नष्ट केलेल्या भांडवलशाही-पूर्व समाजाच्या राखेवर. उलट, भारतात भांडवलशाही-पूर्व समाजाच्या इमल्यावरच भांडवली मजले चढले आहेत. भांडवलदारी समाजाच्या मुक्त विकासासाठी भांडवलशाही-पूर्व समाज उध्वस्त करणे ही सर्वात महत्त्वाची पूर्वअट होती. पण तसे प्रयत्न ना ब्रिटिश वसाहतवाद्यांनी त्यांच्या राजवटीत केले, ना स्वातंत्र्यानंतर सत्तारूढ झालेल्या भारतीय भांडवलदारवर्गाने केले. त्यामुळे आधुनिक भारतीय समाज म्हणजे मक्तेदार-भांडवलदारी वर्चस्व आणि जातीय, धार्मिक व आदिवासी संस्था यांची एक विचित्र गोधडी झाली आहे. म्हणून भांडवलशाही-पूर्व समाजाचा विनाश इच्छिणाऱ्या सर्व पुरोगामी शक्तींची एकजूट उभारणे, आणि लोकशाही क्रांतीची पूर्ती होऊन समाजवादी संक्रमणाची पूर्वतयारी करणे सुलभ होईल अशा तऱ्हेने त्यामधील क्रांतिकारी शक्तींचे दृढीकरण करणे, हे कार्य कामगारवर्गाकडे आणि त्याच्या पक्षाकडे आले आहे.

**६.२** समाजवाद आणि साम्यवाद उभारण्याच्या आपल्या उद्दिष्टावर भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) दृढ राहिला आहे. सध्याचे शासन व बड्या भांडवलदारवर्गाच्या नेतृत्वाखालील भांडवलदारी-जमीनदारी सरकार यांच्या राजवटीखाली हे साध्य करणे शक्य नाही हे उघड आहे. केवळ सर्वहारावर्गाच्या शासनाखालीच खऱ्याखुऱ्या समाजसत्तावादी समाजाची स्थापना होऊ शकते. समाजसत्तावादी समाजाच्या निर्मितीच्या ध्येयावर खंबीरपणे दृढ राहात असतानाच, भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) आर्थिक विकासाचे

प्रमाण आणि कामगारवर्गाच्या व त्याच्या संघटनेच्या राजकीय-वैचारिक परिपक्वतेचे प्रमाण या गोष्टी विचारात घेतो आणि त्या आधारे, खंबीर कामगार-शेतकरी युतीच्या पायावरील, कामगारवर्गाच्या नेतृत्वाखालील सर्व खऱ्याखुऱ्या सरंजामशाहीविरोधी, मक्तेदारीविरोधी आणि साम्राज्यशाहीविरोधी शक्तींच्या दोस्तीवर आधारलेल्या जनतेच्या लोकशाहीची स्थापना हे आजचे तात्कालिक उद्दिष्ट म्हणून जनतेपुढे ठेवतो. ह्यासाठी पहिली आणि सर्वप्रथम गरज आहे ती सध्याच्या भांडवलदारी-जमीनदारी शासनाच्या जागी जनतेच्या लोकशाहीच्या शासनाची स्थापना करणे. हे केले तरच भारतीय क्रांतीची अपूर्ण राहिलेली लोकशाही कार्ये पूर्ण करता येतील व देशाला समाजसत्तावादाच्या मार्गावर नेणे शक्य होईल.

**जनतेच्या लोकशाहीचे सरकार पुढील कार्ये आणि कार्यक्रम पार पाडील :**

**६.३ राज्यरचनेच्या क्षेत्रात :** देशातील विविध राष्ट्रगटांना खरीखुरी समानता आणि स्वायत्तता प्राप्त करून देण्याच्या आधारावर भारतीय संघराज्याच्या ऐक्याचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) झटतो. त्याचप्रमाणे खालील रूपरेषेनुसार संघराज्य पद्धतीच्या लोकशाही राज्यरचनेचा विकास करून घेण्यासाठी तो कार्यरत राहील.

१) जनता हीच सार्वभौम आहे. राजसत्तेची सर्व अंगे जनतेस उत्तरदायी असतील. राजसत्तेचा कारभार पाहणारी सर्वोच्च अधिकारसंस्था जनतेच्या प्रतिनिधींची बनलेली असेल; हे प्रतिनिधी प्रौढ मताधिकार आणि प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे तत्त्व या आधारे निवडलेले असतील आणि त्यांना निवडून देणाऱ्या बहुसंख्य मतदारांनी तशी मागणी केल्यास त्यांचे प्रतिनिधित्व रद्द केले जाईल. अखिल भारतीय केंद्रात लोकसभा आणि राज्यसभा ही दोन सभागृहे राहतील. महिलांसाठी पुरेसे प्रतिनिधित्त्व असण्याची निश्चिती केली जाईल.

२) भारतीय संघराज्यातील सर्व राज्यांना खरीखुरी स्वायत्तता आणि समान अधिकार राहतील. आदिवासी जनांचे प्रदेश, किंवा ज्या प्रदेशांत वसणारे लोक वांशिकदृष्ट्या विशिष्ट प्रकारचे असून त्यांची सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती विशेष स्वरूपाची आहे, त्या प्रदेशांना संबंधित राज्यांतर्गत प्रादेशिक स्वायत्तता दिली जाईल, आणि त्यांना स्वत:च्या विकासासाठी संपूर्ण



सहाय्य दिले जाईल.

३) राज्यपातळीवर वरिष्ठ सभागृहे (विधान परिषदा) असणार नाहीत. त्याचप्रमाणे राज्यात वरून नेमलेले राज्यपालही असणार नाहीत. सर्व प्रशासकीय सेवा त्या त्या राज्याच्या वा स्थानिक संस्थेच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असतील. राज्ये सर्व भारतीय नागरिकांना समान वागणूक देतील आणि जात, लिंग, धर्म, जमात व राष्ट्रगट यांच्या नावाखाली कसलाही भेदभाव करण्यात येणार नाही.

४) संसदेत आणि केंद्रीय प्रशासनात सर्व राष्ट्रीय भाषांची समानता मान्य केली जाईल. संसद सदस्यांना आपल्या स्वत:च्या राष्ट्रीय भाषेत बोलण्याचा अधिकार असेल आणि त्याचे इतर सर्व भाषांतून एकाच वेळी भाषांतर करून द्यावे लागेल. सर्व कायदे, सरकारी आदेश आणि ठराव सर्व राष्ट्रीय भाषांत उपलब्ध करून देण्यात येतील. इतर सर्व भाषा वगळून, एकमेव सरकारी भाषा म्हणून हिंदीचा उपयोग सक्तीने केला जाणार नाही. वेगवेगळ्या भाषांना समानता देऊनच सर्व देशभर हिंदी भाषेचा दळणवळणाची भाषा म्हणून स्वीकार करणे शक्य होईल. तोपर्यंत हिंदी व इंग्रजीचा वापर करण्याची सध्याची व्यवस्था चालू राहील. शिक्षणसंस्थांमध्ये अत्युच्च पातळीपर्यंत स्वत:च्या मातृभाषेत शिक्षण घेण्याचा लोकांचा अधिकार निश्चित केला जाईल. प्रत्येक भाषिक राज्यात, त्याच्या विशिष्ट भाषेचा वापर प्रशासनाची भाषा म्हणून तेथील सर्व सार्वजनिक आणि शासकीय संस्थांमध्ये होईल, याचीदेखील निश्चिती केली जाईल. आवश्यक असेल तेथे राज्याच्या भाषेखेरीज तिच्या जोडीला एखाद्या अल्पसंख्य जमातीच्या किंवा जमातींच्या प्रदेशाच्या भाषेचा उपयोग करण्याची तरतूद केली जाईल. उर्दू भाषा आणि तिची लिपी यांना संरक्षण देण्यात येईल.

५) घटक राज्यांदरम्यान, तसेच विविध राज्यांच्या लोकांदरम्यान, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रांत परस्पर सहकार्याची जोपासना आणि वाढ करून जनतेचे लोकशाही सरकार भारताच्या ऐक्याचे संवर्धन करण्याच्या दिशेने उपाय योजील. राष्ट्रगट, भाषा व संस्कृती यांमधील विविधतांचा आदर केला जाईल, आणि त्या विविधतेतील एकता वृद्धिंगत करणारी धोरणे अंमलात आणली जातील. आर्थिकदृष्ट्या मागास आणि दुर्बल राज्यांना, प्रदेशांना

आणि विभागांना त्यांचा मागासलेपणा झपाट्याने दूर करण्यास मदत करण्याच्या दृष्टीने हे सरकार त्यांच्याकडे खास लक्ष पुरविल आणि त्यांना आर्थिक व अन्य प्रकारचे सहाय्य करील.

६) सर्व पातळ्यांवर सर्वंकष आणि वैज्ञानिक शिक्षण देण्याची तरतूद करण्यासाठी सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेचा विकास केला जाईल. जनतेचे लोकशाही सरकार स्थानिक शासनाच्या क्षेत्रात खेड्यापासून वरपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांचे विस्तृत जाळे तयार करील. त्या संस्था लोकांनी थेट निवडून दिलेल्या असतील आणि त्यांना खरीखुरी सत्ता व जबाबदारी देण्यात येईल; तसेच त्यांना पुरेसा निधीही पुरविण्यात येईल. स्थानिक संस्थांच्या सक्रिय कार्यपद्धतीत जनतेला सहभागी करून घेण्यासाठी सर्व ते प्रयत्न केले जातील. उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण यांचे आधुनिकीकरण करून ती अद्ययावत केली जातील. सर्व प्रकारच्या संशोधन आणि विकाससंस्थांमधून विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास साधला जाईल. क्रीडा क्षेत्राची जोपासना करण्यासाठी सर्वंकष स्वरूपाचे क्रीडा धोरण अंमलात आणले जाईल.

७) जनतेचे लोकशाही सरकार आपल्या सर्व सामाजिक आणि राजकीय संस्थांत लोकशाही बाणा रुजवण्यासाठी झटेल. ते राष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात लोकशाही पद्धतीच्या उपक्रमशीलतेचा आणि नियंत्रणाचा विस्तार करील. यामध्ये राजकीय पक्ष, ट्रेड युनियन्स, किसान आणि शेतमजूर संघटना आणि श्रमिक जनतेच्या इतर वर्गीय व जनसामुदायिक संघटना निर्णायक भूमिका पार पाडतील. देशातील कायदे करणारी आणि शासन चालवणारी यंत्रणा जनतेच्या लोकशाही आशाआकांक्षांना सातत्याने प्रतिसाद देणारी असावी, यासाठी सरकार योग्य ते उपाय योजील आणि शासनाच्या कामात व राज्यकारभारात जनतेची आणि तिच्या संघटनांची सक्रिय भागिदारी असावी म्हणून खबरदारी घेईल. हे सरकार राज्यसंस्थेतील आणि प्रशासनातील नोकरशाही प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी झटेल.

८) जनतेचे लोकशाही सरकार काळा पैसा हुडकून काढील, भ्रष्टाचार निपटून काढील, आर्थिक गुन्हे तसेच भ्रष्टाचारी व्यवहार करणाऱ्या सार्वजनिक सेवकांना सजा देईल.

९) न्यायदानाच्या कारभारात लोकशाही बदल करण्यात येतील. अविलंब



आणि नि:पक्षपाती न्यायाची हमी देण्यात येईल. न्यायालयांत गरजू नागरिकांची सहज दाद लागावी, म्हणून त्यांना कायदेशीर सल्ला आणि मदत मोफत पुरविली जाईल.

१०) जनतेचे लोकशाही सरकार सशस्त्र दलांच्या सदस्यांत देशभक्ती, लोकशाही आणि जनसेवेचा बाणा रुजवील. ते त्यांना चांगले राहणीमान, सेवा-शर्ती, सांस्कृतिक सोयीसुविधा आणि त्यांच्या मुलांना शिक्षण पुरविल. सुदृढ शरीरप्रकृतीच्या सर्व व्यक्तींनी लष्करी प्रशिक्षण घ्यावे आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य व त्याचे रक्षण याबद्दलची आस्था त्यांच्या ठायी रुजावी यासाठी ते प्रयत्नशील राहील.

११) पूर्ण नागरिक स्वातंत्र्याची हमी असेल. व्यक्ती आणि स्थायी निवास यांबाबत अतिक्रमणापासून अभय, आणि खटल्याविना स्थानबद्ध करण्यास मनाई असेल. स्वमतनिर्णय, धार्मिक श्रद्धा व पूजा, भाषण, मुद्रण, सभा, संप, राजकीय पक्ष आणि संघटना बांधण्याचा हक्क यांबाबत निर्बंधरहित स्वातंत्र्य, प्रवास व व्यवसाय यांचे स्वातंत्र्य, मतभेदाचा अधिकार यांची हमी असेल.

१२) प्रत्येक नागरिकाला कामाच्या हक्काची एक मूलभूत हक्क म्हणून हमी असेल; धर्म, जाती, लिंग, वंश वा राष्ट्रीयत्व यांबाबत कसलाही भेदभाव न करता, सर्व नागरिकांना समान अधिकार, व सारख्या कामास सारखा पगार यांची शाश्वती राहील. वेतन व उत्पन्न ह्या बाबतीतल्या मोठ्या तफावती टप्प्याटप्प्याने कमी केल्या जातील.

१३) एका जातीकडून दुसऱ्या जातीवर होणारे सामाजिक जुलुम नष्ट केले जातील. अस्पृश्यता आणि सर्व प्रकारचा सामाजिक भेदभाव कायद्याने दंडणीय ठरविले जातील. नोकऱ्या आणि अन्य शैक्षणिक सोयींच्या बाबतीत दलित, आदिवासी आणि इतर मागास वर्गांना खास सवलती दिल्या जातील.

१४) महिलांना भोगावी लागणारी सामाजिक विषमता व भेदभाव दूर केला जाईल. जमिनीच्या समावेशासह मालमत्तेचा वारसा हक्क, अशा बाबतींत महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क दिले जातील. सर्व जमातींमधील महिलांसाठी त्यांच्या समान हक्कांवर आधारलेले संरक्षणात्मक सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक कायदे अंमलात आणले जातील. विविध व्यवसाय

आणि सेवा यांमध्ये प्रवेश मिळण्याच्या तरतुदींची निश्चिती केली जाईल. कौटुंबिक ढाचांचे लोकशाहीकरण करण्यासाठी बालसंगोपन आणि घरगुती काम यामध्ये योग्य ती पूरक पद्धती आणली जाईल.

१५) राज्यसंस्थेच्या धर्मनिरपेक्ष स्वरूपाची हमी राहील. धार्मिक संस्थांना सरकारच्या कारभारात व देशाच्या राजकीय जीवनात हस्तक्षेप करण्यास बंदी घातली जाईल. अल्पसंख्यांक धार्मिक जमातींना संरक्षण दिले जाईल आणि त्यांच्याबाबतीत भेदभाव करण्यास मनाई केली जाईल.

१६) माध्यमिक स्तरापर्यंत मोफत व सक्तीच्या शिक्षणाची आणि शिक्षणाच्या धर्मनिरपेक्ष स्वरूपाची हमी दिली जाईल.

१७) आरोग्य, औषधोपचार आणि प्रसूती यांबाबतच्या सोयी विनामूल्य करून देणाऱ्या संस्थांचे व्यापक जाळे तयार केले जाईल; बालकांसाठी संगोपनगृहे व पाळणागृहे, श्रमिक जनतेसाठी विश्रांतीगृहे आणि करमणूक केंद्रे व म्हातारपणाचे पेन्शन यांची हमी दिली जाईल. कुटुंब नियोजनाबाबत पुरुष आणि स्त्रियांमध्ये जाणीव निर्माण करण्यासाठी जनतेचे लोकशाही सरकार बळजबरीमुक्त लोकसंख्या धोरणाचा पुरस्कार करील.

१८) पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सर्वंकष स्वरूपाची पावले उचलली जातील. जीवसृष्टीचा समतोल राखण्याची गरज लक्षात ठेवून विकास कार्यक्रम आखले जातील. देशाची जैविक विविधता आणि जैविक साधनसामुग्री यांचे साम्राज्यवादी शोषणापासून रक्षण केले जाईल.

१९) पूर्ण नागरिक म्हणून जीवन जगण्याचा अपंग व्यक्तींचा अधिकार त्यांना समाजात सामावून घेऊन निश्चित केला जाईल. वयस्कर नागरिकांना मानसन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार मिळावा याची शासन गंभीरपणे काळजी घेईल. एकूण पाहता, मूलभूत हक्क मानले गेलेले सामाजिक अधिकार हे जनतेच्या लोकशाहीचे एक मूलभूत तत्त्व राहील.

२०) जनतेचे लोकशाही शासन व सरकार आपल्या जनतेच्या सर्जनशील गुणवत्तेची जोपासना करून नवीन पुरोगामी, जनवादी व धर्मनिरपेक्ष जनसंस्कृती विकसित करील. जनतेचे भौतिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यासाठी साहित्य, कला व संस्कृतीची जोपासना आणि विकास साधण्याकरिता सरकार



आवश्यक ती पावले उचलेल. जातपाती व लैंगिक पक्षपात, धर्मांध पूर्वग्रह, लाचारीच्या आणि अंधश्रद्धेच्या संकल्पना यांच्यापासून मुक्त होण्यासाठी ते जनतेला मदत करील. ते वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देईल आणि देशातील जनतेच्या समान आशाआकांक्षांशी सुसंवाद साधण्यासाठी आदिवासी जनतेसह प्रत्येक भाषिक राष्ट्रगटाची स्वत:ची स्वतंत्र भाषा, संस्कृती आणि जीवनपद्धती यांचा विकास करील. इतर देशांतील जनतेबाबत भ्रातृभावी भावना जोपासण्यासाठी आणि वांशिक अथवा राष्ट्रीय द्वेषभावनांचा त्याग करण्यासाठी ते जनतेला तयार करील.

२१) इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांसाठी सार्वजनिक प्रसारण व्यवस्थेवर भर देऊन प्रसारमाध्यमे विकसित केली जातील. प्रसारमाध्यमांची मालमत्ता खाजगी हातांमध्ये आणि भारतीय प्रसारमाध्यमांची मालमत्ता परकीयांच्या हातांत केंद्रित करण्यास परवानगी दिली जाणार नाही. त्याबाबतीत लोकशाही नियंत्रण आणि उत्तरदायित्व निश्चित केले जाईल.

**६.४ शेती आणि शेतकरी क्षेत्रात :** भारताची अर्थव्यवस्था शेतीप्रधान असून ७० टक्क्यांहून जास्त लोक ग्रामीण भागात राहतात. म्हणून, शेतीचा विकास आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानाच्या दर्जात वाढ, ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास करण्याची किल्ली आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जनतेचे लोकशाही सरकार पुढील कार्ये पार पाडील.

१) आमूलाग्र भूमिसुधारणांची अंमलबजावणी करून जमीनदारशाहीचे उच्चाटन आणि शेतमजूर व गरीब शेतकरी यांना जमिनीचे मोफत वाटप.

२) सावकार आणि जमीनदारांकडून गरीब शेतकरी, शेतमजूर आणि छोटे कारागीर यांनी घेतलेली कर्जे रद्द करणे.

३) बडे व्यापारी व बहुराष्ट्रीय महामंडळे आणि किंमतींचे तीव्र चढउतार यांच्यापासून शेतकऱ्यांचे रक्षण करण्यासाठी सरकारच्या नेतृत्वाखालील बाजारपेठ पद्धतीचा विकास. शेतकरी, कारागीर, शेतमजूर यांना दीर्घ मुदतीची व स्वस्त व्याजदराची कर्जे व त्यांच्या शेतीमालाला रास्त भाव यांची निश्चिती.

४) सिंचन व ऊर्जा सुविधांचा अधिकाधिक विस्तार व त्यांचा योग्य व न्याय्य वापर; शेती क्षेत्रातील देशी संशोधन आणि विकास यांना उत्तेजन;

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी जास्त चांगली बी-बियाणे व आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर करून शेतीच्या पद्धतीत सुधारणा करण्यास शेतकऱ्यांना मदत.

५) शेतमजुरांना पुरेसे वेतन, सामाजिक सुरक्षा आणि जीवनमान दर्जा यांची हमी.

६) शेती आणि इतर सेवांसाठी शेतकऱ्यांच्या आणि कारागिरांच्या राजीखुशीवर आधारित सहकारी संस्थांना उत्तेजन.

७) जनतेला अन्नधान्ये व इतर जीवनावश्यक वस्तू स्वस्त दराने पुरविण्यासाठी व्यापक स्वरूपाची सार्वजनिक वितरण व्यवस्था.

**६.५** भारत हा आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या पातळ्या व वेगवेगळे सामाजिक आणि आर्थिक प्रकार असलेला एक महाकाय देश आहे. म्हणूनच अर्थव्यवस्थेचा विकास आणि जनतेच्या जीवनमानामध्ये सातत्याची सुधारणा होण्यासाठी आवश्यक असलेल्या उत्पादक शक्तींची झपाट्याने वाढ व्हावी, याकरिता जनतेचे लोकशाही सरकार निर्णायक भूमिका पार पाडील. त्यासाठी अर्थव्यवस्थेतील मोक्याच्या क्षेत्रांमध्ये सार्वजनिक मालकी, आणि इतर क्षेत्रांमध्ये शासनाची नियंत्रक व मार्गदर्शक भूमिका, या आवश्यक आहेत. जनतेची लोकशाही अर्थव्यवस्था ही बहुसंरचनात्मक असून तीत मालकीचे वेगवेगळे प्रकार राहतील; मात्र सार्वजनिक क्षेत्राला वर्चस्वाचे स्थान असेल. जागतिक अर्थव्यवस्थेतील मोठे बदल लक्षात घेता, परदेशांतील विकसित तंत्रज्ञानाचा वापर करीत असताना, भारत आपला आत्मनिर्भरतेचा पाया मजबूत करण्यासाठी खंबीर प्रयत्न करील.

**६.६ उद्योग आणि कामगार क्षेत्रात :** शेतकरीवर्गाची निकृष्ट क्रयशक्ती हे आपल्या उद्योगधंद्यांचे एकच दुखणे नसून, त्याला मक्तेदारी घराण्यांच्या मगरमिठीला, वाढत्या प्रमाणावर होणाऱ्या परदेशी भांडवलाच्या शिरकावाला, तसेच उत्पादनाच्या जवळपास सर्व क्षेत्रांतील साम्राज्यवादी संस्थांच्या विविध प्रकारच्या वर्चस्वाला तोंड द्यावे लागते. मक्तेदार घराण्यांच्या हातातील संपत्तीच्या केंद्रीकरणामुळे आर्थिक विकास विकृत बनतो आणि प्रचंड विषमतेला चालना मिळते. परदेशी भांडवलावरील अवलंबित्व आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाचे आदेश, यामुळे शोषण व विकृत स्वरूपाचा विकास सुलभ होतात आणि



त्यामुळे जनतेच्या गरजा भागू शकत नाहीत. म्हणून औद्योगिक क्षेत्रामध्ये जनतेचे लोकशाही सरकार पुढील कार्ये पार पाडील :

१) उद्योग, वित्त, व्यापार आणि सेवा यांच्या विविध क्षेत्रांतील भारतीय आणि परदेशी मक्तेदाऱ्या नष्ट करण्यासाठी, शासन त्यांची मालमत्ता स्वत:कडे घेण्यासह, इतर सर्व उपाय व पावले उचलील.

२) आधुनिकीकरण व लोकशाहीकरण यांवर भर देऊन आणि नोकरशाही स्वरूपाचे नियंत्रण व भ्रष्टाचार यांपासून मुक्त अशा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे मजबूतीकरण; कडक उत्तरदायित्वाची व व्यवस्थापनात कामगारांच्या सहभागाची निश्चिती करून, त्यामधून ते स्पर्धाक्षम करणे, ज्यामुळे ते अर्थव्यवस्थेमध्ये उत्तुंग स्थान व्यापू शकेल.

३) निवडक क्षेत्रांमध्ये विकसित तंत्रज्ञान मिळवण्यासाठी व त्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ करण्यासाठी, या क्षेत्रांमध्ये थेट परदेशी गुंतवणुकीला मान्यता. एकूण अर्थव्यवस्थेच्या हितरक्षणार्थ वित्तीय भांडवलाचे ओघ नियंत्रित करणे.

४) मध्यम व लघुउद्योगांना कर्ज आणि रास्त किंमतीत कच्चा माल पुरवून मदत करणे, आणि त्यांना बाजारपेठीय सुविधांची मदत देणे.

५) देशाचा समतोल आणि नियोजनबद्ध विकास साध्य करण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या आणि बाजारपेठेच्या विविध क्षेत्रांचे नियंत्रण आणि सुसूत्रीकरण. परदेशी व्यापारावर नियंत्रण.

६) कामगारांच्या जीवनमानात आमूलाग्र सुधारणा. त्यासाठी : अ) जीवनवेतन निश्चित करणे, ब) कामाचे तास टप्प्याटप्प्याने कमी करणे, क) प्रत्येक पद्धतीच्या अपंगत्वासाठी, तसेच बेरोजगारीसाठी सामाजिक विमा, ड) कामगारांसाठी घरांची तरतूद, इ) गुप्त मतदानाने कामगार संघटनांना मान्यता आणि त्यांच्या सामूहिक पद्धतीने वाटाघाटी करण्याच्या, तसेच संप करण्याच्या हक्काला मान्यता; फ) बालमजूरी नष्ट करणे.

७) कामगार, शेतकरी आणि कारागीर यांना कर-आकारणीमध्ये जास्तीत जास्त सवलती. शेती, उद्योगधंदे व व्यापार यांमध्ये श्रेणीवार कर-आकारणीस सुरुवात; आणि सामान्य जनतेच्या हितासाठी असलेल्या किंमत धोरणाची

प्रभावी अंमलबजावणी.

**६.७ परराष्ट्रीय धोरणाच्या क्षेत्रात :** जागतिक शांतता टिकवून धरणे, साम्राज्यवादी वर्चस्वाला विरोध करणे आणि आंतरराष्ट्रीय संबंधांचे लोकशाहीकरण करणे यासाठी भारत आपली रास्त भूमिका बजावील. त्यासाठी जनतेचे लोकशाही सरकार पुढील कार्ये करील :

१) मैत्री आणि सहकार्याच्या पायावर सर्व देशांशी संबंध विकसित करणे. आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका खंडांतील सर्व विकसनशील देशांमध्ये ऐक्यभाव व संबंध दृढ करणे. दक्षिण-दक्षिण सहकार्याला उत्तेजन देणे आणि साम्राज्यवादी देशांच्या वर्चस्वाचा मुकाबला करण्यासाठी अलिप्ततावादी चळवळ पुन्हा कार्यक्षम करणे.

२) समाजसत्तावादी देश आणि सर्व शांतताप्रेमी देश यांच्याशी मैत्रीचे संबंध आणि सहकार्य विकसित करणे; साम्राज्यशाहीविरोध आणि लोकशाही व समाजसत्तावाद यांसाठी चाललेल्या सर्व लढ्यांना पाठिंबा देणे.

३) अणुयुद्धाचा धोका नष्ट करणे; जागतिक आण्विक नि:शस्त्रीकरण, जनसामूहिक विध्वंसाची सर्व प्रकारची आण्विक, रासायनिक आणि जैविक शस्त्रास्त्रे नष्ट करणे, आणि त्यांच्या चाचण्या व उत्पादन यांवर बंदी घालण्यासाठी कार्य करणे. सर्व परदेशी लष्करी तळ नष्ट करण्याची मागणी. पर्यावरणाच्या रक्षणासाठी आणि जीवसृष्टीचा समतोल राखण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याला उत्तेजन.

४) भारताच्या शेजारी देशांशी सध्या अस्तित्वात असलेले सर्व मतभेद आणि संघर्ष शांततापूर्ण पद्धतीने मिटविण्यासाठी खास आणि जोमदार प्रयत्न करणे. पाकिस्तान, चीन, बांगलादेश, नेपाळ, भुतान, श्रीलंका व ब्रम्हदेश यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध दृढ करणे. दक्षिण आशियाई सहकार्याला उत्तेजन देणे.

## ७
## जनतेच्या लोकशाही आघाडीची बांधणी

**७.१** भारतीय क्रांतीच्या मूलभूत कार्यांची संपूर्ण व सर्वांगीण पूर्ती करण्यासाठी, सध्याच्या अवस्थेत आजचे बड्या भांडवलदारांच्या नेतृत्वाखालचे



भांडवलदारी-जमीनदारी शासन बदलून, त्या जागी कामगारवर्गाच्या नेतृत्वाखालचे जनतेच्या लोकशाहीचे शासन स्थापन करणे, हे कार्य अनिवार्य झाले आहे.

**७.२** आपल्या क्रांतीच्या सध्याच्या विकासावस्थेत तिचे स्वरूप मुख्यत: सरंजामशाहीविरोधी, साम्राज्यशाहीविरोधी, मक्तेदारीविरोधी आणि लोकशाहीवादी आहे. आपल्या क्रांतीच्या टप्प्यामधून त्याच्या प्राप्तीसाठी चाललेल्या लढ्यातील वेगवेगळ्या वर्गांच्या भूमिकाही निर्धारित होतात. सध्याच्या युगात समाजसत्तावादाच्या विजयाप्रत आगेकूच करीत असताना टाकावयाचे एक आवश्यक पाऊल म्हणून सर्वहारावर्गाला लोकशाही क्रांतीचे नेतृत्व करावे लागेल. ती जुन्या धर्तीची भांडवली लोकशाही क्रांती नव्हे, तर कामगारवर्गाने संघटित केलेली आणि त्याच्या नेतृत्वाखाली होणारी, नव्या धर्तीची जनतेची लोकशाही क्रांती आहे.

**७.३** जनतेच्या लोकशाही क्रांतीला पहिले व सर्वप्रथम कार्य करावे लागेल, ते म्हणजे शेतकऱ्यांच्या हिताच्या आमूलाग्र भूमिसुधारणा पार पाडणे, आणि त्या योगे शेती व उद्योगधंद्यांतील आपल्या उत्पादकशक्तींना जखडून ठेवणाऱ्या सरंजामदारी आणि निम-सरंजामदारी बंधनांचे अवशेष पार लयाला नेणे. शिवाय, जातिव्यवस्था आणि अन्य अनिष्ट सामाजिक प्रथांसारखे भांडवलशाही-पूर्व समाजाचे अवशेष ज्या सामाजिक रनचेद्वारा खेड्यांना मागासलेपणाच्या खोड्यांत युगानुयुगे डांबून ठेवीत आहेत, त्या समाजरचनेच्या सुधारणेचे झंजावाती इलाजही त्या कार्याच्या जोडीला योजावे लागतील. हे कार्य शेतकी क्रांतीशी अविभाज्यपणे निगडित आहे. खरे म्हणजे, शेतकी क्रांती हाच लोकशाही क्रांतीचा कणा आहे. दुसरे तातडीचे कार्य म्हणजे साम्राज्यशाही, बहुराष्ट्रीय महामंडळे आणि आंतरराष्ट्रीय मक्तेदारी भांडवलाच्या विविध संस्थांच्या वर्चस्वाच्या अतिघातक प्रभावापासून आपल्या जनतेचे आर्थिक, राजकीय आणि सामाजिक जीवन मुक्त करणे. मक्तेदारी भांडवलाची सत्ता मोडून काढण्याचे कार्यही त्याच्याशी जोडलेले आहे.

**७.४** परंतु बडा भांडवलदारवर्ग आणि शासनसंस्थेत प्रमुख स्थानी बसलेले त्याचे राजकीय प्रतिनिधी यांना निर्धाराने विरोध करून त्यांच्याशी नेटाने दोन हात केल्याखेरीज, आजच्या संदर्भात क्रांतीची ही मूलभूत आणि आद्य कर्तव्ये पार पाडणे शक्य होणार नाही. आपल्या वर्गीय वर्चस्वाला

आधार देण्याकरिता ते जमीनदारशाहीशी युती करतात. परकीय मक्तेदार भांडवलाचे रक्षण करण्यासाठी आणि त्याचा आणखी शिरकाव व्हावा यासाठी ते आपल्या हातांतील राजसत्तेचा उपयोग करतात. शिवाय, परकीय मक्तेदारांशी तडजोड व सहकार्य करण्याची आणि देशातील बड्या जमीनदारांशी दोस्ती करण्याची धोरणे आखून, ते भांडवलदारी विकासमार्गावर नेटाने पावले टाकीत आहेत व त्यामुळे आपल्या देशात मक्तेदारी भांडवलाची वाढ व्हायला प्रचंड मदत होत आहे. म्हणून, जनतेच्या लोकशाही क्रांतीचा विनातडजोड विरोध केवळ सरंजामदारी जमीनदारशाहीला आणि परकीय मक्तेदार भांडवलशाहीलाच आहे असे नव्हे, तर त्यांच्या समवेत परकीय वित्त-भांडवलाशी तडजोड व सहकार्य आणि जमीनदारशाहीशी सख्य करण्याची धोरणे आखणाऱ्या, राजसत्तेच्या नेतृत्वपदी असणाऱ्या बड्या भांडवलदारवर्गासही तिचा विरोध आहे.

**७.५** भारताचा कामगारवर्ग आणि त्याचा राजकीय पक्ष म्हणजे भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांचे नेतृत्व असल्याखेरीज जनतेची लोकशाही आघाडी उभारण्याचे कार्य यशस्वी होणार नाही आणि क्रांती विजयी होणार नाही. ऐतिहासिकदृष्ट्या, आधुनिक समाजामध्ये कामगारवर्गाशिवाय इतर कोणताही वर्ग ही भूमिका पार पाडू शकत नाही. आपल्या काळातला समग्र अनुभव ह्या सत्याची भरपूर साक्ष देतो.

**७.६** कामगार आणि शेतकरी वर्गांची भक्कम एकजूट हाच जनतेच्या लोकशाही आघाडीचा पाया व आधार आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याचे रक्षण करणे, दूरगामी लोकशाही परिवर्तन घडवून आणणे, सर्वांगीण सामाजिक प्रगतीची शाश्वती निर्माण करणे, ही कार्ये पार पाडण्यामधील सर्वात महत्त्वाची शक्ती कामगार-शेतकरी एकजूट हीच आहे. क्रांती यशस्वी करण्यासाठी इतर वर्गांची भूमिका ही अत्यंत निर्णायकरित्या कामगार-शेतकरी एकजुटीच्या ताकदीवर व स्थिरतेवर अवलंबून असते.

**७.७** भांडवलशाहीने शेतीमध्ये खोलवर शिरकाव केल्यामुळे शेतकरीवर्गामध्ये स्पष्टपणे वेगवेगळे थर पडले आहेत आणि त्याचे वेगवेगळे विभाग क्रांतीमध्ये वेगवेगळ्या भूमिका पार पाडतात. त्यांपैकी शेतमजूर आणि गरीब शेतकरी हे ग्रामीण कुटुंबांत अतिप्रचंड बहुसंख्येने आहेत आणि त्यांना जमीनदार-



भांडवलदारांच्या निर्दय शोषणाला सामोरे जावे लागते. हे वर्ग कामगारवर्गाचे मूलभूत दोस्त आहेत. मध्यम शेतकरी हेदेखील ग्रामीण विभागांतील सावकारी भांडवलाच्या, सरंजामी आणि भांडवली जमीनदारांच्या, तसेच बहुराष्ट्रीय महामंडळे आणि बडे भांडवलदार यांचे नियंत्रण असलेल्या भांडवलदारी बाजारपेठेच्या लूटमारीचे बळी असतात. ग्रामीण विभागांतील जमीनदारी वर्चस्व त्यांच्या सामाजिक स्थानास विविध प्रकारे एवढा उपद्रव देत असते की तेही जनतेच्या लोकशाही आघाडीत विश्वासू दोस्त बनतात.

**७.८** सधन शेतकरी हा शेतकऱ्यांमधील एक वजनदार विभाग आहे. भांडवलदारी-जमीनदारी शेतकी धोरणांमुळे त्यांच्या काही विभागांचा नि:संशय फायदा झाला आहे आणि स्वातंत्र्योत्तर काळातील राजवटींखालीदेखील त्यांना लाभ झाला आहे. ते शेतमजुरांना आपल्या शेतांवर रोजंदारीने कामावर ठेवत असल्याने, त्यांचा कल भांडवलदार-जमीनदारांच्या पंक्तीत बसण्याचा असतो. तरीसुद्धा सतत होणाऱ्या किंमतींतील चढउतारांमुळे आणि मक्तेदारी व्यापारी व बहुराष्ट्रीय महामंडळांच्या पकडीखालील बाजारपेठेच्या हल्ल्यांमुळे ते होरपळून निघत असल्याने, त्यांचा भांडवलदारी-जमीनदारी सरकारशी खटका उडतो. विशिष्ट प्रसंगी, त्यांनादेखील जनतेच्या लोकशाही आघाडीत आणता येईल. त्यांचे स्वरूप डळमळीत असताही, जनतेच्या लोकशाही क्रांतीमध्ये ते भूमिका बजावू शकतात.

**७.९** शहरी आणि ग्रामीण मध्यमवर्गांनादेखील भांडवलदारी-जमीनदारी राजवटीखाली फार हाल सोसावे लागतात. मध्यमवर्गीय कर्मचारी, शिक्षक, व्यावसायिक, अभियंते, डॉक्टर आणि बुद्धिजीवी वर्गांतील नवे थर, हा समाजाचा एक महत्त्वपूर्ण व वजनदार विभाग आहे. भांडवलशाहीचा झालेला आणखी विकास आणि उदारीकरणाची धोरणे, यांमुळे मध्यमवर्गातील स्तरीकरण जास्त सखोल झाले आहे. त्यांच्यामधील एका वरच्या थराला त्याचा फायदा झाला असून, इतर मध्यमवर्गाच्या भूमिकेमध्ये ते सहभागी नाहीत. परंतु जीवनावश्यक वस्तूंच्या सतत वाढत जाणाऱ्या किंमती, शासनाने लादलेल्या वाढत्या करांचा परिणाम, बेरोजगारीचा तीव्र प्रश्न आणि मूलभूत जीवनावश्यक सोयींचा अभाव, यांमुळे त्यांच्यातील मोठा विभाग फारच संत्रस्त होतो. हे विभाग जनतेच्या लोकशाही आघाडीमध्ये दोस्त बनू शकतात व बनतीलही, आणि क्रांतीसाठी त्यांना जिंकून घेण्यासाठी हरएक प्रयत्न झाला पाहिजे. या

थरांतील जनतेला जनवादी उद्दिष्टांसाठी संघटित करण्यामध्ये पुरोगामी बुद्धिजीवीवर्गाची भूमिका महत्त्वाची आहे.

**७.१०** एक वर्ग म्हणून, भारतीय भांडवलदारवर्गाचा साम्राज्यशाहीशी आणि सरंजामदारी व निम-सरंजामदारी शेतकी व्यवस्थेशी संघर्ष आणि अंतर्विरोध आहेत. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात ह्या वर्गाचा बडा व मक्तेदारी विभाग तडजोड, दबाव आणि सौदेबाजीच्या मार्गाने हे संघर्ष आणि अंतर्विरोध मिटविण्यासाठी आपल्या हातांतील राजसत्तेचा उपयोग करीत आहे. हे करण्याच्या क्रमात तो जमीनदारांना सत्तेत वाटेकरी करीत आहे. तो जनताविरोधी आणि कम्युनिस्टविरोधी आहे आणि जनतेच्या लोकशाही आघाडीला, तिच्या क्रांतिकारक उद्दिष्टांना त्याचा ठाम विरोध आहे.

**७.११** बडे नसलेले भांडवलदार हे मक्तेदार भांडवलदार नाहीत आणि त्यांना अनेक प्रकारे बड्या भांडवलदारांच्या व परदेशी बहुराष्ट्रीय महामंडळांच्या विषम स्पर्धेला तोंड द्यावे लागते. भांडवलशाही अरिष्टात आल्यामुळे आणि बहुराष्ट्रीय महामंडळांनी अर्थव्यवस्थेत विना-अटकाव शिरकाव केल्यामुळे, भांडवलदारांचे हे विभाग आणि परदेशी भांडवलदार यांच्यामधील अंतर्विरोध तीव्रतर होतील. बडा भांडवलदारवर्ग आपली आर्थिक सत्ता आणि सरकारातील वर्चस्व यांचा उपयोग करून आपल्या ह्या दुर्बल वर्गबंधूंच्या जीवावर स्वत:पुढचे अरिष्ट निवारण करण्याचे प्रयत्न करतो. म्हणून, भांडवलदारवर्गातील ह्या थरांनादेखील राजसत्तेला विरोध करणे भाग पडेल व त्यांना जनतेच्या लोकशाही आघाडीत स्थान मिळू शकेल. परंतु हे विसरता कामा नये की ते अद्याप बड्या भांडवलदारांबरोबर सत्तेचे वाटेकरी आहेत, आणि याच राजवटीत आपली आणखी भरभराट होण्याची मोठी आशा ते बाळगून आहेत. त्यांचे स्वरूप वस्तुगतदृष्ट्या प्रगतिशील असले, तरी देशी बडे भांडवलदार आणि परकीय साम्राज्यवादी यांच्या संदर्भात त्यांची वर्गीय स्थिती कमजोर असल्याकारणाने ते अस्थिर असतात आणि एका बाजूस साम्राज्यवादी व त्यांचे बडे भांडवलदार साथीदार आणि दुसऱ्या बाजूस जनतेची लोकशाही आघाडी या दोहोंमध्ये ते हेलकावे खात असतात. त्यांच्या ह्या दुहेरी स्वरूपामुळे अस्थिर दोस्त म्हणूनही ते क्रांतीत कसा भाग घेतील, हे प्रत्यक्षातील अनेक ठोस गोष्टींवर अवलंबून आहे. वर्गीय शक्तींच्या बलाबलांत काय बदल होतात, साम्राज्यशाही, जमीनदारशाही आणि जनता यांमधले अंतर्विरोध किती तीव्र होतात, बड्या



भांडवलदारांच्या नेतृत्वाखालील राज्यसंस्था आणि भांडवलदारवर्गाचे बाकीचे विभाग यांमधील अंतर्विरोध किती खोलवर जातात, इत्यादी गोष्टींवर त्यांचे भाग घेणे अवलंबून आहे.

**७.१२** त्यांच्या प्रश्नांचा काळजीपूर्वक व ठोस अभ्यास करून त्यांना लोकशाही आघाडीच्या बाजूस घेण्यासाठी हरएक प्रयत्न केला पाहिजे. देशी मक्तेदार आणि परदेशी साम्राज्यवादी स्पर्धक, या दोहोंविरुद्धच्या त्यांच्या सर्व झगड्यांत त्यांना पाठिंबा देण्याची एकही संधी कामगारवर्गाने गमावता कामा नये.

**७.१३** जनतेची लोकशाही क्रांती यशस्वी करण्यासाठी जनतेच्या लोकशाही आघाडीची उभारणी करणे, हे आपले मूलभूत उद्दिष्ट आहे आणि त्यासाठी बड्या भांडवलदारवर्गाच्या नेतृत्वाखालील सध्याच्या राजसत्तेशी संघर्ष करणे अपरिहार्य आहे, याचा कामगारवर्ग आणि भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) स्वत:ला एक क्षणभरही विसर पडू देत नाहीत. परंतु त्याच वेळी बड्या भांडवलदारांसहित भारतीय भांडवलदारवर्ग आणि साम्राज्यशाही, यांच्यामधील अंतर्विरोधांची व संघर्षांचीही ते दखल घेतात. बहुराष्ट्रीय महामंडळे आणि परदेशी वित्तीय भांडवल यांचा बेलगाम आणि मुक्त शिरकाव व्हावा यासाठी भारतीय अर्थव्यवस्था खोलून दिल्यामुळे हे अंतर्विरोध तीव्र होतील. ह्या घटनांचा काळजीपूर्वक अभ्यास करीत असताना, भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) असे प्रत्येक मतभेद, वितुष्ट, संघर्ष आणि अंतर्विरोध यांचा उपयोग साम्राज्यवाद्यांना अलग पाडण्यासाठी आणि लोकशाही प्रगतीसाठी जनतेने चालविलेला लढा बळकट करण्यासाठी करून घेईल. जागतिक शांतता आणि साम्राज्यशाहीविरोध यांसारख्या देशाच्या खऱ्याखुऱ्या हितांशी संबंधित अशा प्रश्नांवर, साम्राज्यशाहीशी संघर्ष निर्माण करणाऱ्या सर्व आर्थिक व राजकीय प्रश्नांवर, देशाचे सार्वभौमत्व व स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण सदृढ करण्याच्या सर्व प्रश्नांवर, सरकारला आपला संपूर्ण पाठिंबा देण्यास कामगारवर्ग कधीही कचरणार नाही.

**७.१४** स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही देशात प्रतिगामी व प्रतिक्रांतिकारक प्रवृत्ती अस्तित्वात आहेत. सरंजामदारी विचारसरणीच्या प्रचंड प्रभावाच्या आधारावर त्या जनतेच्या मागासलेपणाचा उपयोग करून घेतात. अलिकडच्या दशकांमध्ये

काँग्रेस विरोधातील वाढत्या असंतोषामुळे काँग्रेसची जी सतत घसरण होत आहे, तिचा फायदा घेऊन, त्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी, त्या नेटाने प्रयत्न करीत आहेत. भारतीय जनता पक्ष हा असा एक प्रतिगामी पक्ष आहे. त्याचे व्यासपीठ फुटीर आणि धर्मांध आहे व त्याचा प्रतिगामी गाभा इतर धर्मांविरुद्ध द्वेष, असहिष्णुता आणि कट्टर राष्ट्रवादी दुरभिमान हा आहे. भाजपला फॅसिस्ट विचारसरणीच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मार्गदर्शन व वर्चस्व असल्यामुळे, तो काही एखादा साधासुधा भांडवलदारी पक्ष नाही. भाजप सत्तेवर आला की रा. स्व. संघाला शासनसत्तेच्या साधनांत आणि शासनयंत्रणेत प्रवेश मिळतो. त्याच्या हिंदुत्ववादी विचारसरणीमुळे पुनरुत्थानवादाला उत्तेजन मिळते आणि हिंदु राष्ट्र स्थापनेच्या उद्दिष्टाने भारताची संमिश्र संस्कृती झिडकारली जाते. अशा धर्मांध भूमिकेच्या वाढत्या प्रभावातून अल्पसंख्यांकांतील मूलतत्त्ववाद वाढीस लागतो. देशाच्या राजकारणाच्या धर्मनिरपेक्ष पायावर त्याचे गंभीर परिणाम होतात आणि डाव्या व जनवादी चळवळीला त्यापासून गंभीर धोका निर्माण होतो. बडे भांडवलदार व जमीनदार यांच्या एका मोठ्या विभागाव्यतिरिक्त अमेरिकेच्या नेतृत्वाखालील साम्राज्यशाहीदेखील भाजपला सर्वतोपरी पाठिंबा देते.

**७.१५** भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) परिस्थितीच्या या सर्व घटकांवर आधारून देशातील सर्व देशाभिमानी शक्तींशी एकजूट करण्याचे कार्य स्वत:समोर ठेवतो. त्या शक्ती म्हणजे भांडवलशाही-पूर्व समाजाची जळमटे झाडून टाकण्यात, शेतकी क्रांती सर्वंकष पद्धतीने आणि शेतकरी समाजाच्या हिताच्या दृष्टीने पूर्ण करण्यात, परदेशी भांडवलाच्या अनिर्बंध शिरकावाला विरोध करण्यात आणि भारताची अर्थव्यवस्था, समाजजीवन व संस्कृती यांची मौलिक पुनर्रचना करण्याच्या वाटेतले सर्व अडथळे दूर करण्यात ज्यांना रस आहे, अशा सर्व शक्ती होय.

**७.१६** कामगार-शेतकरी एकजूट ज्याचा गाभा आहे अशा सर्व देशाभिमानी आणि लोकशाहीनिष्ठ शक्तींच्या क्रांतिकारी ऐक्याद्वारे जनतेच्या लोकशाही क्रांतीची उद्दिष्टे साकार करण्याचा लढा हा गुंतागुंतीचा आणि दीर्घकालीन लढा आहे. तो बदलत्या अवस्थांत व बदलत्या टप्प्यांत लढावा लागणार आहे. भिन्नभिन्न वर्ग आणि एकाच वर्गातील भिन्नभिन्न थर, क्रांतिकारक चळवळीच्या वेगवेगळ्या विकासटप्प्यांत वेगवेगळ्या भूमिका घेणे क्रमप्राप्त आहे. जनआंदोलने



विकसित करणारा आणि क्रांतीचे दूरगामी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संयुक्त आघाडीच्या योग्य डावपेचांचा वापर करणारा शक्तिशाली कम्युनिस्ट पक्षच ह्या बदलांचा उपयोग करू शकतो आणि त्या विभागांना आपल्या दलात आकर्षित करू शकतो. सर्वात प्रामाणिक व स्वार्थत्यागी अशा क्रांतिकारकांना आपल्या दलात समाविष्ट करून घेणारा पक्षच क्रांतिकारी लढ्यामध्ये अपरिहार्यपणे निर्माण होणारी अनेक वळणे आणि आडवळणे यांच्यामधून वाट काढून जनसमूहांना नेतृत्व देऊ शकतो.

**७.१७** झपाट्याने बदलणाऱ्या राजकीय परिस्थितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाला अनेक प्रकारच्या हंगामी घोषणा तयार कराव्या लागतील हे उघड आहे. सध्याच्या राज्यकर्त्यावर्गांना पदभ्रष्ट करून, कामगार-शेतकऱ्यांच्या भक्कम ऐक्यावर आधारलेले नवे लोकशाही राज्य व सरकार स्थापण्याचे कार्य कम्युनिस्ट पक्ष जनतेसमोर सतत ठेवीत राहील. त्याचबरोबर जनतेला मदत करण्याचा कार्यक्रम अंमलात आणण्यास वचनबद्ध असलेली सरकारे अस्तित्वात आणण्यासाठी, उपलब्ध असलेल्या संधींचा पक्ष फायदा घेईल, आणि सध्याच्या मर्यादांच्या चौकटीत पर्यायी धोरणे मांडण्याचा आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करील. अशा सरकारांच्या निर्मितीने श्रमिक जनतेच्या क्रांतिकारक चळवळीस बळ लाभेल, आणि त्यातून जनतेची लोकशाही आघाडी उभारण्याच्या प्रक्रियेस मदत होईल. परंतु त्यातून देशापुढील आर्थिक व राजकीय समस्या मात्र मूलभूत पद्धतीने सुटणार नाहीत. म्हणून, ठोस परिस्थितीला अनुसरून, अशी सरकारे राज्यांत वा केंद्रात घडविण्याच्या संधींचा पक्ष उपयोग करील; पण तसे करताना बड्या भांडवलदारांच्या नेतृत्वाखालील सध्याची भांडवलदारी-जमीनदारी शासनसंस्था बदलण्याच्या आवश्यकतेबाबत तो जनतेला सतत शिक्षण देत राहील.

**७.१८** जनतेच्या लोकशाहीची स्थापना आणि समाजसत्तावादी स्थित्यंतर शांततामय मार्गाने साध्य करण्याचा भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)चा प्रयत्न आहे. बलशाली अशी जनसामुदायिक क्रांतिकारी चळवळ उभारून आणि लढ्याच्या संसदीय आणि संसदबाह्य प्रकारांची सांगड घालून, प्रतिगामी शक्तींच्या प्रतिकारावर मात करण्यासाठी आणि ही स्थित्यंतरे शांततामय उपायांनी घडवून आणण्यासाठी कामगारवर्ग आणि त्याचे दोस्त प्रयत्नांची पराकाष्ठा करतील. मात्र हे नेहमीच ध्यानात ठेवले पाहिजे की राज्यकर्तेवर्ग

स्वखुशीने आपल्या सत्तेचा कधीच त्याग करीत नसतात. ते जनतेची इच्छा धाब्यावर बसवू पाहतात आणि बेकायदेशीर उपायांनी व हिंसेने ती उलथवू पाहतात. म्हणूनच, क्रांतिकारक शक्तींना डोळ्यांत तेल घालून सावध राहिले पाहिजे आणि आपल्या कार्याला असे वळण लावले पाहिजे की कोणताही प्रसंग आला, देशातील राजकीय जीवनाला कशीही कलाटणी मिळाली, तरी त्या सर्व प्रसंगांना समर्थपणे तोंड देता येईल.

## ८
## कम्युनिस्ट पक्षाची बांधणी

**८.१** भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) जनतेची लोकशाही प्रस्थापित करण्याचा आपला क्रांतिकारी कार्यक्रम भारतीय जनतेसमोर ठेवीत आहे. जनतेच्या लोकशाही क्रांतीमुळे समाजसत्तावादाकडे आणि शोषणमुक्त समाजाकडे आगेकूच करण्याचा मार्ग मोकळा होईल. भारतीय जनतेला मुक्ती देणाऱ्या अशा क्रांतीचे नेतृत्व कामगारवर्गाने शेतकरीवर्गाशी युती करून केले पाहिजे. हे उद्दिष्ट साधण्यासाठी कामगारवर्गाची बिनीची फौज म्हणून कम्युनिस्ट पक्षाला साम्राज्यशाही, मक्तेदार भांडवलशाही आणि जमीनदारशाही यांच्याविरुद्ध लढाऊ संघर्षांचे नेतृत्व करावे लागेल. भारतातील प्राप्त परिस्थितीला मार्क्सवाद-लेनिनवादाची तत्त्वे ठोस प्रकारे लागू करून, विजय मिळेपर्यंत पक्षाला राजकीय, वैचारिक, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा सर्व आघाड्यांवर प्रदीर्घ लढे लढावे लागतील.

**८.२** समाजसत्तावादाची पिछेहाट झाल्यानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखालील साम्राज्यशाहीने जी जोरदार कम्युनिस्टविरोधी मोहीम सुरू केली आहे, तिच्याविरुद्ध वैचारिक संघर्ष तीव्र करणे हे कम्युनिस्टांचे अत्यावश्यक कार्य आहे. कम्युनिस्टविरोध हे राज्यकर्त्यावर्गाचे एक प्रमुख वैचारिक हत्यार असून, कम्युनिस्ट त्याचे खरे स्वरूप चव्हाट्यावर आणतात आणि त्याच्याविरुद्ध लढतात. सरंजामदारी व भांडवलदारी विचारधारांच्या पगड्यापासून जनतेला मुक्त करून तिची राजकीय जाणीव उंचावण्यासाठी, साम्राज्यशाही पुढे रेटत असलेल्या जागतिकीकरण, उदारीकरण, आणि मुक्त बाजारपेठीय अर्थव्यवस्था यांच्या पुरस्कर्त्यांच्या प्रचाराचा मुकाबला करण्यासाठी, कम्युनिस्ट त्याविरुद्ध सातत्याने संघर्ष करतात.



**८.३** धार्मिक मूलतत्त्ववाद, जीर्णमतवाद, धर्मांधता आणि जातपातवाद यांमुळे लोकांमध्ये फूट पडते आणि त्यांच्या लोकशाही जाणीवेची पिछेहाट होते. जनवादी आंदोलनाच्या विकासात फूट पाडण्यासाठी साम्राज्यशाही ज्या प्रतिगामी शक्तींना फूस देते, त्या भांडवली राष्ट्रवाद व दुरभिमानाच्या बरोबरीने त्यांचा उपयोग करतात. या फुटीर शक्ती आणि संकल्पनांविरुद्ध कम्युनिस्टांनी निर्धारपूर्वक लढा दिलाच पाहिजे.

**८.४** सर्व आघाड्यांवर लढा करण्यासाठी आणि क्रांतिकारी चळवळीला दिशा देण्यासाठी जनसामुदायिक क्रांतिकारक पक्षाची उभारणी करणे अत्यावश्यक आहे. अशा पक्षाने सातत्याने जनआंदोलने विकसित करून आपला जनाधार वाढविला पाहिजे आणि त्या प्रमाणात राजकीय आणि वैचारिकदृष्ट्या आपला प्रभाव सुदृढ केला पाहिजे. यासाठी लोकशाही मध्यवर्तित्वावर आधारित अशा शक्तिशाली आणि शिस्तबद्ध पक्षाची आवश्यकता आहे. कामगारवर्ग आणि श्रमिक जनतेचे सर्व विभाग यांच्या संबंधांतील आपली ऐतिहासिक जबाबदारी पार पाडण्यासाठी पक्षाने सातत्याने आपले शिक्षण व पुनर्शिक्षण केलेच पाहिजे, आपली वैचारिक-तात्त्विक पातळी उंचावली पाहिजे आणि आपली संघटनात्मक ताकद उभारली पाहिजे.

**८.५** जनतेच्या लोकशाही सरकारची स्थापना, ह्या कार्यांची यशस्वी अंमलबजावणी आणि जनतेच्या लोकशाही शासनसंस्थेतील कामगारवर्गाचे नेतृत्व, यांमुळे भारतीय क्रांती लोकशाही क्रांतीच्या टप्प्यावर थांबून न राहता, उत्पादक शक्तींचा विकास करून ती समाजसत्तावादी परिवर्तनाच्या टप्प्यात प्रवेश करील.

**८.६** आपण कोणत्या उद्दिष्टासाठी लढत आहोत आणि लोकशाही राष्ट्रीय प्रगतीचा मार्ग काय राहील याचे सुस्पष्ट चित्र जनतेसमोर असावे म्हणून भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) हा कार्यक्रम जनतेसमोर ठेवीत आहे आणि आजची प्रमुख व निकडीची कार्ये तिच्यासमोर मांडत आहे. सर्व श्रमिक जनतेला, कामगारवर्गाला, शेतकरीवर्गाला, महिला, विद्यार्थी, युवक, बुद्धिजीवी व मध्यमवर्गांना, खऱ्याखुऱ्या जनवादी विकासामध्ये आणि समृद्ध जीवननिर्मितीमध्ये ज्यांना रस आहे अशा सर्वांना, त्या कार्यांची पूर्ती करण्यासाठी आणि हे उद्दिष्ट गाठण्यासाठी जनतेच्या लोकशाही आघाडीत ऐक्यबद्ध व्हा,

अशी हाक आमचा पक्ष देत आहे.

**८.७** आपल्या जनतेच्या लढाऊ परंपरा आणि आपल्या संस्कृती व सभ्यतेमध्ये जे काही उत्तम आणि मौल्यवान आहे, ते भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) पुढे नेतो. भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) देशाभिमानाची सांगड सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवादाशी घालतो. आपल्या सर्व कार्यात व लढ्यांत पक्ष मार्क्सवाद-लेनिनवादाचे शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञान व सिद्धांतांना मार्गदर्शक मानतो, कारण हेच एकमेव तत्त्वज्ञान मानवसमाजाच्या संपूर्ण मुक्ततेचा अचूक मार्ग दाखवते. श्रमिक जनतेच्या सर्वात प्रगत, सर्वात क्रियाशील आणि सर्वात नि:स्वार्थी सुपुत्रांना आणि सुकन्यांना कम्युनिस्ट पक्ष स्वत:च्या दलात एकत्र आणतो, आणि त्यांना खंदे मार्क्सवादी-लेनिनवादी आणि सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवादी म्हणून तयार करण्याचा अविरत प्रयत्न करतो. लोकशाही विकासक्रमाच्या लढ्यात सर्व देशाभिमानी आणि लोकशाहीनिष्ठ शक्तींची एकजूट उभारण्याच्या कार्यासाठी, ह्या कार्यक्रमाच्या पूर्तीसाठी एक सामर्थ्यशाली जनतेची लोकशाही आघाडी उभारण्याच्या महान कार्यासाठी कम्युनिस्ट पक्ष आपली सर्व शक्ती आणि साधनसामुग्री पणास लावतो.

**८.८** अमेरिकेच्या नेतृत्वाखालील साम्राज्यशाही जगावर वर्चस्व लादण्यासाठी प्रयत्नशील आहे. भारताची अर्थव्यवस्था, राजकीय पद्धती आणि सार्वभौमत्वदेखील आज धोक्यात आहेत. अशा परिस्थितीत सर्व साम्राज्यवादविरोधी आणि पुरोगामी शक्तींना ह्या आक्रमणाचा सरळ सरळ आणि धैर्याने मुकाबला करण्यासाठी एकत्रित करणे, हे कामगारवर्गाचे व त्याच्या पक्षाचे महत्त्वाचे कार्य बनते. सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवाद उचलून धरून आणि उद्देश व कृतीसाठी साऱ्या जगातील कम्युनिस्ट शक्तींची एकजूट उभारूनच आपल्याला ही क्रांतिकारी जबाबदारी पार पाडणे शक्य आहे. तसेच क्रांतिकारी लढ्यांचे नेतृत्व करताना आणि समाजसत्तावादाची उभारणी करताना आलेल्या कम्युनिस्ट चळवळीच्या अनुभवांतून योग्य ते धडे घेऊन, आणि समाजसत्तावादाच्या पिछेहाटीच्या कारणांचे विश्लेषण करून आपण हे कार्य करू शकतो. उजव्या दुरुस्तीवादी आणि डाव्या एकांगीवादी अपप्रवृत्तींविरुद्ध संघर्ष करीत राहण्याची शपथ भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) घेतो. जनतेच्या लोकशाही आघाडीची उभारणी करण्यासाठी वर्गशक्तींच्या संतुलनात बदल घडवून आणण्याच्या लढ्यांत भारतीय जनतेला संघटित करण्याचे कार्य पक्ष अविरतपणे



पुढे चालविल.

**८.९** भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)ला हा विश्वास आहे की मार्क्सवाद-लेनिनवादाच्या शिकवणीच्या मार्गदर्शनाखाली, आणि कामगारवर्गाच्या व त्याच्या क्रांतिकारी बिनीच्या फौजेच्या नेतृत्वाखाली, आपल्या देशातील जनता हा कार्यक्रम अंमलात आणल्याशिवाय राहणार नाही. आमच्या पक्षाला हा विश्वास आहे की आपला महान भारत देशदेखील जनतेच्या लोकशाहीचे विजयी राष्ट्र म्हणून पुढे येईल आणि समाजसत्तावादाच्या मार्गाने आगेकूच करील.

***(अनुवाद : कॉ. कृष्णा खोपकर / कॉ. डॉ. अशोक ढवळे)***

❑❑❑

## टिपणे

आपल्या जनतेच्या लढाऊ परंपरा आणि आपल्या संस्कृती व सभ्यतेमध्ये जे काही उत्तम आणि मौल्यवान आहे, ते भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) पुढे नेतो. भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) देशाभिमानाची सांगड सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवादाशी घालतो. आपल्या सर्व कार्यात व लढ्यांत पक्ष मार्क्सवाद-लेनिनवादाचे शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञान व सिद्धांतांना मार्गदर्शक मानतो, कारण हेच एकमेव तत्त्वज्ञान मानवसमाजाच्या संपूर्ण मुक्ततेचा अचूक मार्ग दाखवते. श्रमिक जनतेच्या सर्वात प्रगत, सर्वात क्रियाशील आणि सर्वात नि:स्वार्थी सुपुत्रांना आणि सुकन्यांना कम्युनिस्ट पक्ष स्वत:च्या दलात एकत्र आणतो, आणि त्यांना खंदे मार्क्सवादी-लेनिनवादी आणि सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवादी म्हणून तयार करण्याचा अविरत प्रयत्न करतो. लोकशाही विकासक्रमाच्या लढ्यात सर्व देशाभिमानी आणि लोकशाहीनिष्ठ शक्तींची एकजूट उभारण्याच्या कार्यासाठी, ह्या कार्यक्रमाच्या पूर्तीसाठी एक सामर्थ्यशाली जनतेची लोकशाही आघाडी उभारण्याच्या महान कार्यासाठी कम्युनिस्ट पक्ष आपली सर्व शक्ती आणि साधनसामुग्री पणास लावतो.

---

समाजवाद आणि साम्यवाद उभारण्याच्या आपल्या उद्दिष्टावर भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) दृढ राहिला आहे. सध्याचे शासन व बड्या भांडवलदारवर्गाच्या नेतृत्वाखालील भांडवलदारी-जमीनदारी सरकार यांच्या राजवटीखाली हे साध्य करणे शक्य नाही हे उघड आहे. केवळ सर्वहारावर्गाच्या शासनाखालीच खऱ्याखुऱ्या समाजसत्तावादी समाजाची स्थापना होऊ शकते... खंबीर कामगार-शेतकरी युतीच्या पायावरील, कामगारवर्गाच्या नेतृत्वाखालील सर्व खऱ्याखुऱ्या सरंजामशाहीविरोधी, मक्तेदारीविरोधी आणि साम्राज्यशाहीविरोधी शक्तींच्या दोस्तीवर आधारलेल्या जनतेच्या लोकशाहीची स्थापना हे आजचे तात्कालिक उद्दिष्ट म्हणून पक्ष जनतेपुढे ठेवतो.

**- पक्ष कार्यक्रमामधून**

**प्रकाशक :** डॉ. अशोक ढवळे, सेक्रेटरी, महाराष्ट्र राज्य कमिटी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, जनशक्ती कार्यालय, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१३.

**दूरध्वनी :** (०२२) २४९५१५७६/२४९२६८४१ • **फॅक्स :** (०२२) २४९६१५२५

**मुद्रक :** न्यू एज प्रिटिंग प्रेस, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

**(जानेवारी २०११ : ५००० प्रती)**

# पक्ष कार्यक्रम

## भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)

**महाराष्ट्र राज्य कमिटीचे प्रकाशन**

**किंमत ५ रुपये**

देशातील व महाराष्ट्रातील घटनांचे लोकशाही विश्लेषण
सामाजिक व आर्थिक न्यायाचा बिनतडजोड पुरस्कार
सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्ट व जनताविरोधी कारभाराचे वस्त्रहरण
दलित-शोषित-कामकारी जनतेच्या लढ्यांशी बांधिलकी

**यांना वाहिलेले**

**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या**
**महाराष्ट्र राज्य कमिटीचे साप्ताहिक मुखपत्र**
**''जीवनमार्ग''**

**वार्षिक वर्गणी - रु. २००** **आजीव वर्गणी - रु. २०००**

आपली वर्गणी बँक ड्राफ्ट/मनी ऑर्डरने आपल्या संपूर्ण पत्त्यासहित पाठवा :-
व्यवस्थापक, ''जीवनमार्ग'', जनशक्ती कार्यालय, पांडुरंग बुधकर मार्ग,
वरळी, मुंबई - ४०० ०१३.
फोन : (०२२) २४९५१५७६/२४९२६८४१
फॅक्स : (०२२) २४९६ १५ २५ इ-मेल : mahacpim@gmail.com

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर पक्षाची सुस्पष्ट वर्गीय भूमिका मांडणारी

**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या**
**केंद्रीय कमिटीची साप्ताहिक मुखपत्रे**
**''लोकलहर'' (हिंदी)** **''पीपल्स डेमॉक्रसी'' (इंग्रजी)**

**पक्षाचे वैचारिक त्रैमासिक**
**''द मार्क्सिस्ट'' (इंग्रजी)**

**वार्षिक वर्गणी**

**''लोकलहर'' - रु. २००** **''पीपल्स डेमॉक्रसी'' - रु. २५०**
**''द मार्क्सिस्ट'' - रु. ६०**

आपली वर्गणी बँक ड्राफ्ट/मनी ऑर्डरने आपल्या संपूर्ण पत्त्यासहित पाठवा :-
मॅनेजर, ''लोकलहर/पीपल्स डेमॉक्रसी/द मार्क्सिस्ट''
१५, तालकटोरा मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१.
फोन : (०११) २३७३८७२५

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची उपलब्ध प्रकाशने

१. भारतीय स्वातंत्र्याची ६१ वर्षे : जीवनमार्ग विशेषांक - ५० रुपये
२. कॉ. शामराव आणि कॉ. गोदावरी परुळेकर - १० रुपये
३. महिलाविषयक प्रश्नांबाबत दृष्टिकोन आणि कार्ये - १० रुपये
४. अखिल भारतीय दलित हक्क संमेलनाचा ठराव - ०५ रुपये
५. पक्षसंघटनेविषयी मौलिक मार्गदर्शन - २० रुपये
६. पक्ष शाखांचे महत्त्व आणि शाखा सचिवांची कार्ये - ०५ रुपये
७. पक्ष कार्यक्रम - ०५ रुपये
८. पक्ष घटना - ०५ रुपये

## जनशक्ती प्रकाशनाची उपलब्ध प्रकाशने

१. भारताचा स्वातंत्र्यलढा आणि स्वातंत्र्योत्तर भारत
बी. टी. रणदिवे - ८० रुपये
२. मार्क्सवाद परिचयमाला
शिव वर्मा - ६० रुपये
३. खरा कम्युनिस्ट कसे बनावे?
लिऊ शाओ ची - ४० रुपये
४. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष - क्रांतीच्या दिशेने आगेकूच
प्रा. डॉ. विठ्ठल मोरे - ५० रुपये
५. स्मरणचित्रे : क्रांतिकारी शहिदांची
शिव वर्मा (अनुवाद : चित्रा बेडेकर) - ५० रुपये
६. शहीद भगतसिंग : आठवणी, विवेचन आणि विचार
संपादक : डॉ. अशोक ढवळे । डॉ. रमेशचंद्र पाटकर - ५० रुपये
७. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा व डाव्या पक्षांचे योगदान
कृष्णा खोपकर - १० रुपये
८. सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र : सुवर्ण कोणाच्या खिशात?
डॉ. सुलभा ब्रह्मे - ५० रुपये
९. शिकवण भीमाची (भीम क्रांती गीते)
डॉ. आदिनाथ इंगोले - १० रुपये